


## वर्ष ६४ वे

स्थापना : १९६१ दूरध्वनी : ७२०८८३६०९०

बेस्ट

# बेस्ट कला आणि क्रीडा मंडळ


बहुमजली इमारत, ७ वा मजला, बेस्ट,

कुलाबा, मुंबई - ४०० ००१

Email ID : bestartsandsportsclub@gmail.com


३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षाचा

# वार्षिक अहवाल

## २०२४-२०२५

# बेस्ट कला आणि क्रीडा मंडळ

## -: अनुक्रमणिका :-


| अ.क्र. | तपशिल | पान क्र. |
|---|---|---|
| १. | ६४वी सर्वसाधारण सभेची सूचना | १ |
| २. | २०२४-२५ वर्षाकरिता नियामक समिती व रचना | २ |
| ३. | २०२४-२५ वर्षाकरिता व्यवस्थापन समिती कला- क्रीडा रचना | २-३ |
| ४. | ६३वी सर्वसाधारण सभेचा वृत्तांत | ४ |
| ५. | कला विभाग वार्षिक अहवाल :<br>नाटय व एकांकिका | ५-७ |
| ६. | एकांकिका | ७-१० |
| ७. | ललितकला व प्रदर्शन – रंगावली स्पर्धा | १०-१२ |
| ८. | संगीत व साहित्य – सुगम संगीत, अभंग, समुह गायन व नृत्य स्पर्धा - निकालपत्र | १३-१६ |
| ९. | विविध करमणूक – मराठी व्यावसायिक नाटक | १६-१७ |
| १०. | क्रीडा विभाग वार्षिक अहवाल :<br>मैदानी खेळ | १७-२० |
| ११. | बॅडमिंटन | २०-२२ |
| १२. | क्रिकेट | २३-२५ |
| १३. | फुटबॉल | २५-२६ |
| १४. | हॉकी | २६-२७ |
| १५. | बैठे खेळ | २७-२९ |
| १६. | कबड्डी | २९-३१ |
| १७. | टेबल टेनिस | ३२-३४ |
| १८. | व्हॉलीबॉल | ३४-३५ |
| १९. | कुस्ती | ३५-३६ |
| २०. | मंडळातील सन २०२४-२५ मधील कलाकार / खेळाडूंची उल्लेखनीय कामगिरी | ३६-३८ |
| २१. | बेस्ट कला व रौप्य पदक / सन्मानचिन्ह | ३८ |
| २२. | निधन पावलेल्या कलाकार व खेळाडू यांना भावपूर्ण श्रध्दांजली | ३९-४० |
| २३. | २०२४-२५ वर्षाचे उत्पन्न - खर्च लेखा विवरणपत्र | ४१ |
| २४. | २०२४-२५ वर्षाचे ताळेबंद पत्रक | ४२ |
| २५. | २०२४-२५ वर्षाचे लेखा परीक्षण प्रमाणपत्र | ४३ |

बेस्ट

## बेस्ट कला आणि क्रीडा मंडळ

-: सूचना :-

मंडळाचे अध्यक्ष – महाव्यवस्थापक यांच्या मान्यतेने '६४वी वार्षिक सर्वसाधारण सभेची' सूचना सभासदांकरिता जारी करण्यात येत आहे.

बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाच्या सर्व सभासदांना सूचना करण्यात येते की, शुक्रवार दिनांक १८.०७.२०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजता मंडळाची '६४वी वार्षिक सर्वसाधारण सभा', कॉन्फरन्स् हॉल, १ला मजला, बेस्ट भवन, कुलाबा, मुंबई - ४०० ००१ येथे घेण्यात येणार आहे.

* कार्यक्रम पत्रिका *

१. सभेची सूचना वाचून दाखविणे.

२. दिनांक १८.१०.२०२४ रोजी झालेल्या ६३व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त संमत करणे.

३. दिनांक ३१ मार्च, २०२५ रोजी संपलेल्या सन २०२४ – २५ आर्थिक वर्षाचा अहवाल व लेखा विवरणपत्र स्वीकृत करणे व संमत करणे.

४. अध्यक्षांच्या परवानगीने इतर विषयांवर चर्चा करणे.

यासाठी ७ दिवसांची लेखी सूचना खालील व्यक्तींकडे पाठविणे. सभेमध्ये जास्तीत जास्त ३ प्रश्नांची उत्तरे दिली जातील किंवा सभेपूर्वी कार्यालयात उत्तरे दिली जातील.

अ) क्रीडा विभाग : श्री. प्रमोद यादव, सरचिटणीस - क्रीडा

ब) कला विभाग : श्री. विजय सूर्यवंशी, सरचिटणीस - कला

क)सप्रअ(वै) मनोरंजन : बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाचे कार्यालय, बहुमजली इमारत, ७ वा मजला, कुलाबा,

दिनांक : ०१.०७.२०२५

प्रमोद यादव<br>सरचिटणीस- क्रीडा

---

१. वार्षिक अहवालाच्या प्रती (लेखा विवरणपत्रासह) मंडळाचे कार्यालय, बहुमजली इमारत, ७वा मजला, बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई –४०० ००१ यांच्याकडे दिनांक ०४.०७.२०२५ पासून उपलब्ध होतील. तसेच सभेची सूचना व सदर अहवाल www.bestundertaking.com या संकेत स्थळावर MEDIA-१२ या ठिकाणी सुध्दा उपलब्ध होईल.

२. वार्षिक अहवाल व लेखा विवरणपत्राबाबतच्या सर्व दुरुस्त्या व सूचना लेखी स्वरुपात श्री. प्रमोद यादव-सरचिटणीस (क्रीडा) व श्री. विजय सूर्यवंशी-सरचिटणीस-कला यांच्याकडे दिनांक १५.०७.२०२५ पर्यंत देणे अनिवार्य आहे.

३. जर पुरेशा गणसंख्येअभावी (३० सभासदांपेक्षा कमी उपस्थिती) ही सभा तहकूब झाली तर, सदर सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने भरेल.

<u>बेस्ट कला आणि क्रीडा मंडळ</u>

-: <u>वार्षिक अहवाल २०२४-२५</u> :-

दिनांक ३१ मार्च, २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल लेखा विवरणपत्र आम्ही सादर करीत आहोत.

प्रस्तुत वर्षी दरमहा प्रती सदस्य रु.२०/- प्रमाणे एकूण वार्षिक वर्गणी रु.१७,४१,२८० मंडळाकडे उपलब्ध झाली. एकूण सभासद संख्या मार्च, २०२५ अखेर ७०९४ होती.

प्रत्यक्ष लेखाचे विवरणपत्र व खर्चाचा तपशील पत्रक शेवटच्या दोन पृष्ठांवर दिला आहे.

अ) <u>नियामक समिती :-</u>

<u>२०२४ - २५ वर्षाकरिता नियामक समितीची रचना पुढीलप्रमाणे (माहे एप्रिल ते मार्च) :-</u>

| | | |
|---|---|---|
| १. | मा. अध्यक्ष – महाव्यवस्थापक | : श्री. एस.व्ही.आर.श्रीनिवास (दि.०६.०२.२०२५पासून ) |
| | मा. अध्यक्ष – महाव्यवस्थापक | : श्री. अनिल डिग्गीकर (दि.३१.१२.२०२४पर्यंत) |
| २. | मा. उपाध्यक्ष - सहा.महाव्यवस्थापक (वि.पु.) | : श्री.बिलाल शेख (दि.०१.०३.२०२५ पर्यंत) |
| ३. | मा. सभापती - कला | : डॉ. राजेंद्र पाटसुते |
| ४. | मा. सभापती - क्रीडा | : श्री. धनंजय पवार (दि. ३१.१०.२०२४ पर्यंत) |
| ५. | मा. सरचिटणीस - क्रीडा | : श्री. प्रमोद यादव |
| ६. | मा. सरचिटणीस - कला | : श्री. विजय सूर्यवंशी |
| ७. | मा. उप सरचिटणीस - क्रीडा | : श्री.सुदास सावंत |
| ८. | मा. उप सरचिटणीस - कला | : श्रीमती संगिता पुरव |
| ९. | मा. लेखा परीक्षक | : श्री.दिपक तांबवे (दि.०१.०६.२०२४ पासून) |
| १०. | मा. खजिनदार | : श्री.उल्हास बने |
| ११. | मा. निबंधक | : श्री. राजेंद्र भोईर ((दि१३.०८.२०२४ पासून) |
| १२. | मा. विधी सल्लागार | : श्री. सुरेश भोसले |

ब) <u>२०२४ - २५ वर्षाकरिता ‘व्यवस्थापन समिती-कला’ ची रचना पुढीलप्रमाणे</u> :-

| | | |
|---|---|---|
| १. | सभापती-कला | : डॉ. राजेंद्र पाटसुते |
| २. | मा. सरचिटणीस-कला | : श्री. विजय सूर्यवंशी |
| ३. | मा. उप सरचिटणीस-कला | : श्रीमती संगिता पुरव |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | मा. लेखा परीक्षक | : | श्री.दिपक तांबवे (दि.०१.०६.२०२४ पासून) |
| ५. | मा. खजिनदार | : | श्री.उल्हास बने |
| ६. | मा. निबंधक | : | श्री.राजेंद्र भोईर (दि.१३.०८.२०२४ पासून) |
| ७. | मा.सचिव - नाटय | : | श्री. प्रमोद सुर्वे |
| ८. | मा. सचिव - एकांकिका | : | पद रिक्त |
| ९. | मा.सचिव - ललितकला व प्रदर्शन | : | श्री. संतोष दळवी |
| १०. | मा. सचिव - विविध करमणूक | : | श्री. प्रशांत सावंत |
| ११. | मा. सचिव- संगीत व साहित्य | : | श्री. सुनिल खोबरेकर |
| १२. | नामनिर्देशित सदस्य | : | श्री. मनोहर जुन्नरे (दि.०१.०६.२०२४पासून सेवानिवृत्त) |
| १३. | स्वीकृत सदस्य | : | श्री. श्याम शिंदे |

क) २०२४ - २५वर्षाकरिता 'व्यवस्थापन समिती - क्रीडा' ची रचना पुढीलप्रमाणे:-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सभापती-क्रीडा | : | श्री. धनंजय पवार (दिनांक ०१.११.२०२४ पासून सेवानिवृत्त) |
| २. | मा. सरचिटणीस - क्रीडा | : | श्री. प्रमोद यादव |
| ३. | मा. उप सरचिटणीस - क्रीडा | : | श्री.सुदास सावंत |
| ४. | मा. लेखा परीक्षक | : | श्री) श्री.दिपक तांबवे (दि.०१.०६.२०२४ पासून) |
| ५ | मा. खजिनदार | : | श्री. उल्हास बने (दि. ०१.०४.२०२४पासून) |
| ६. | मा.निबंधक | : | श्री. राजेंद्र भोईर (दि. १३.०८.२०२४ पासून) |
| ७. | मानद् सचिव-मैदानी खेळ | : | श्री. राजेश पवार |
| ८. | मानद् सचिव-बॅडमिंटन | : | श्रीमती सायली परब |
| ९. | मानद् सचिव-क्रिकेट | : | श्री. विनय सोपटे |
| १०. | मानद् सचिव-फुटबॉल | : | श्री. सुर्यकांत भोपी |
| ११. | मानद् सचिव-हॉकी | : | श्री. सुनिल शिंदे |
| १२. | मानद् सचिव-बैठे खेळ | : | श्री. निलेश परब |
| १३. | मानद् सचिव-कबड्डी | : | श्री. किशोर औटी |
| १४. | मानद् सचिव-टेबल टेनिस | : | श्रीमती लता धूरी |
| १५. | मानद् सचिव-व्हॉलीबॉल | : | श्री. शिवकुमार गोसाई |
| १६. | स्वीकृत सदस्या - क्रीडा | : | श्रीमती प्रणिता रावराणे |
| ड) | मनोरंजन पर्यवेक्षक | : | श्री. अशोक सांगळे |

## -: शुक्रवार दिनांक १८.१०.२०२४ रोजी झालेल्या ६३व्या सर्वसाधारण सभेचा वृत्तांत :-

बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाची ६३वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दिनांक १८.१०.२०२४ रोजी सायंकाळी ५.३० वाजता, कॉन्फरन्स् हॉल, पहिला मजला, बेस्ट भवन, कुलाबा आगार, मुंबई – ४०० ००१ येथे घेण्यात आली. सदर सभेस एकूण ५९ सभासद उपस्थित होते.

सभेचे अध्यक्षपद भूषविण्याकरिता श्री. प्रमोद यादव - सरचिटणीस (क्रीडा) यांनी डॉ. राजेंद्र पाटसुते, सभापती - कला – मुख्य व्यवस्थापक (मा सं.व औ. सं)_यांना विनंती केली. श्री.विजय सूर्यवंशी, सरचिटणीस (कला) यांनी अनुमोदन दिले. डॉ.राजेंद्र पाटसुते, सभापती - कला – मुख्य व्यवस्थापक (मा.सं. व औ.सं) यांनी अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर सभापती-(क्रीडा), श्री. धनंजय पवार यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. तसेच श्री. विजय सूर्यवंशी, सरचिटणीस (कला) यांनी सभापती-(क्रीडा), श्री. धनंजय पवार यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

सभेच्या प्रारंभी मंडळाच्या सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे लेखा विवरणपत्र व ताळेबंद पत्रक सभासदांच्या स्वीकृतीकरिता ठेवण्यात आले. उपस्थित सभासदांनी त्यास हात उंचावून सहमती दर्शविली. सन २०२३-२४ चे वार्षिक लेखा विवरणपत्र व ताळेबंद पत्रक मंजूर झाल्याचे अध्यक्षांनी सदर सभेत घोषित केले. सन २०२३-२४ मध्ये मंडळाच्या कला व क्रीडा विभागाने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचे विश्लेषण अनुक्रमे, श्री. विजय सूर्यवंशी, सरचिटणीस (कला) व श्री. प्रमोद यादव, सरचिटणीस (क्रीडा) यांनी सदर सर्वसाधारण सभेत केले.

### अध्यक्षांचे मार्गदर्शनपर भाषण :-

### सभेचे अध्यक्ष – डॉ. राजेंद्र पाटसुते सभापती - कला – मुख्य व्यवस्थापक (मा सं.व औ. सं) :-

बेस्ट कला आणि क्रीडा मंडळ ६३ वर्षे पूर्ण करून ६४ वर्षात पर्दापण करित आहे. याबद्दल सर्वांचे अभिनंदन. मंडळाची वाटचाल योग्यप्रकारे चालू आहे. कारण मंडळाचा इतिहास आणि पूर्वीच्या पदाधिकारी यांनी पध्दतशीर मांडणी करून दिलेली आहे. याद्वारे अनेक कलाकार मराठी नाटय व सिनेमासृष्टीला दिलेत याचा आपणांस सार्थ अभिमान आहे. सर्वांगिण विकास होण्याकरिता कामगारांच्या कौशल्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.सदर प्रक्रिया आपण समजून घेऊन विकसित केले तर ते मंडळाच्या हिताचे राहिल.

सभासदांच्या वाढीसाठी आपण सर्वांनी योगदान देणे महत्वाचे आहे. कारण सभासदांची वर्गणी हाच महत्वाचा आर्थिक स्त्रोत आहे. यामुळे मंडळ कार्यरत राहण्यास उपयुक्त ठरते. एखादे चांगले काम हीच तुमची ओळख भविष्यात राहणार आहे, प्रत्येकाने मंडळाची काळजी घ्यावी. पुढील वाटचालीसाठी आपल्या सर्वांना शुभेच्छा देतो, धन्यवाद !

## कला विभाग

### नाटय विभाग

१. ६३व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाटय स्पर्धा – २०२४-२५ :-

बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाच्या, नाटय विभागाच्या वतीने, ६३ व्या महाराष्ट्र राज्य नाटयस्पर्धेत श्रीनिवास नार्वेकर लिखित व प्रविण नाईक दिग्दर्शित दोन अंकी मराठी नाटक 'जगज्जेता' हे नाटक सादर करण्यात आले. हया नाटकाचा कर्मचारी प्रयोग सोमवार दि.१६ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी ०३.३० वा.यशवंत नाटयमंदिर,मांटुगा येथे तसेच राज्य नाटय स्पर्धेचा प्रयोग बुधवार दिनांक १८ डिसेंबर २०२४ रोजी स. ११.३० वाजता साहित्य संघ मंदिर, गिरगाव येथे संपन्न झाला.

या नाटकासाठी सहदिग्दर्शक - गणेश मिंडे , नेपथ्य – नंदकुमार सावंत, प्रकाश योजना – प्रशांत सावंत, पार्श्वसंगीत – भूषण मेहेर, वेशभूषा – संगिता पुरव, रंगभूषा – वासुदेवा आंब्रे ,नृत्य दिग्दर्शक - अनिकेत खैरे, नेपथ्य सहाय्य - सचिन मांगेला, प्रकाशयोजना सहाय्य – सुशिल शिर्के, वेशभुषा सहाय्य - अश्विनी मोहिते यांचं पडद्या मागे योगदान होते.

या नाकटकाचा काळ साधारण २३०० वर्षापूर्वीचा – जग जिंकण्याच्या महत्त्वाकांक्षेने निघालेला ग्रीसचा बादशहा सम्राट अलेक्झांडर .. पुत्र बृहस्पतीचा .. शिष्य ॲरिस्टॉटलचा ..मसिडोनियाच्या राजगादीवर बसल्यावर अवघ्या दहा वर्षातच गाजवला. त्याने भव्य पराक्रम ..आणि अर्ध्याहून अधिक जग सामावून घेतलं आपल्या मुठीत … पण समजत नाहीत सगळयाच गोष्टी आपल्याला टीचभर आयुष्याच्या पसा-यात ..वेळ यावी लागते. नेमकी अशा गोष्टी समजण्याची .. माणूस येतो मोकळ्या हाताने .. जातोही मोकळ्या हातानेच..

काहीही नाही हाती उरत त्याच्या .. समजल्या या गोष्टी सम्राट अलेक्झांडरलाही .. पण निघून गेली होती. वेळ.. जग जिंकायला निघालेला सम्राट अलेक्झांडर जाताना गेलाही रिकाम्या हातानेच …मृत्यू हे नेहमीच नेहमीच शाश्वत सत्य .. नाही बदलू शकत कोणीही ..असतो केवळ आनंद जन्म आणि मृत्यू यांच्यामधल्या काळातला .. तो आनंदच केवळ आपला.. मग तो कोणाचाही .. तुमचा, आमचा किंवा संपूर्ण जग न जिंकताही जगज्जेतेपदाचा मुकुट घेऊन अजरामर राहीलेल्या सम्राट अलेक्झांडचाही …

ही कहाणी याच अलेक्झांडरची…त्याच्या उदयाची, पराक्रमाची, क्रौर्याची आणि मैत्रीचीही, अपरिहार्य हतबलतेची आणि नियतीशरणेची .. आणि एका महापराक्रमाच्या दुर्दैवी अस्ताची

'जगज्जेता' हे नाटक प्रेक्षकांना फक्त मनोरंजनच नाही, तर एक जीवनदृष्टीही देऊन गेलं. इतिहासाच्या पल्याड जात माणसाच्या अस्तित्वाच्या प्रश्नांना भिडणारा हा प्रयोग निश्चितच लक्षात राहणारा ठरला.

'जगज्जेता' अशा आशयाचे हे नाटक होते. या नाटकामध्ये गणेश मिंडे दिनेश कानडे या सारखे अनेक कलाकारांनी सहभाग घेतला होता.

६३वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाटय स्पर्धेत सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित केलेल्या प्राथमिक फेरीचे मुंबई -२ केंद्रातून जाहीर करण्यात आले. 'जगज्जेता' या नाटकात आपल्या रंगभूषेला प्रथम पारितोषिक प्राप्त झाले आहे.

| अ.क्र | नाव | तंत्रज्ञ | पारितोषिक नांव | नाटकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | वासुदेव आंब्रे | रंगभूषा | प्रथम परितोषिक | जगज्जेता |

६३व्या महाराष्ट्र राज्य हौशी हिंदी नाटय स्पर्धा – २०२४-२५:- बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाच्या वतीने, गेली अनेक वर्षे महाराष्ट्र राज्य नाटय स्पर्धेत सातत्याने सहभाग घेतला जातो, आजवर बेस्टच्या कित्येक नाटकांनी इतिहास घडवला आहे. बेस्टच्या या परंपरेमुळे अनेक हौशी कलाकार, पुढे दिग्गज कलाकार म्हणून नावारुपाला आले आहेत. अर्थात यात बेस्टच्या अनेक गुरुतुल्य व्यक्तिमत्वांचं फार मोठं योगदान आहे, त्या सर्व ज्येष्ठ आणि श्रेष्ठ महाविभुतींना अभिवादन करुन, यंदा ६३ व्या महाराष्ट्र राज्य हिंदी हौशी नाटय स्पर्धेत सहर्ष सादर करण्यात आले.

श्री. शफाअत खान लिखित व प्रमोद सुर्वे आणि माधव साने दिग्दर्शित, दोन अंकी नाटक ''शोभायात्रा'' या नाटकाचा स्पर्धा प्रयोग, रविवार दिनांक ०९.०३.२०२५ रोजी, साहित्य संघ मंदिर, गिरगांव येथे सकाळी ११ वाजता सादर करण्यात आला. तत्पूर्वी बुधवार दिनांक ०५.०३.२०२५ रोजी, यशवंत नाटय मंदिर, मांटुगा येथे सायकाळी ०६.०० वाजता. सर्व नाटय रसिक प्रेक्षकांसाठी विनामूल्य प्रयोग आयोजित करण्यात आला.

६३व्या महाराष्ट्र राज्य हौशी हिंदी नाटय स्पर्धेत बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाच्या वतीने मुंबई केंद्र अंतिम फेरीत, शफाअत खान लिखित आणि प्रमोद सुर्वे व माधव साने दिग्दर्शित ''शोभायात्रा'' हे हिंदी नाटक , साहित्य संघ मंदिर , गिरगाव येथे सादर झाले होते.

जाहीर झालेल्या निकालाद्वारे मंडळाला पुढील पारितोषिक जाहीर झाली आहेत...

| अ.क्र | कर्मचा-यांचे नाव | प्रयोगाचे नांव | पारितोषिक नांव | नाटकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | संविद नांदलसकर | उत्कृष्ट अभिनय | रौप्य पदक | 'शोभायात्रा' |
| २ | चंद्रकांत सावंत | अभिनय | गुणवत्ता प्रमाणपत्र | |

''शोभायात्रा'' हे नाटक संपूर्ण महाराष्ट्रातून पाचव्या क्रमांकाने विजेते ठरले आहे.

बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाच्या रंगमंचावरील व पडद्यामागील सर्व कलाकार तसेच तंत्रज्ञ यांनी मनापासून मेहनत घेऊन ‘बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाचा नाटय क्षेत्रात असलेला दबदबा कायम राखला, त्यांबद्दल सर्व कलाकारांचे मनापासून हार्दिक अभिनंदन.!

या नाटकात सहभागी सर्व कलाकारांना अमूल्य सहकार्य केल्या बद्दल, सर्व कलाकारांच्या विभागांचे आणि त्यांच्या अधिका-यांचे व विभागप्रमुखांचे मनापासून आभार. !

हे नाटक उभं करण्यासाठी कलाकारांना पाठबल आणि सदैव्य प्रोत्साहन देणारे, मंडळाचे सभापती (कला) डॉ. राजेंद्र पाटसुते साहेब तसेच बेस्ट उपक्रमातील सर्व हितचिंतक आणि कर्मचारी यांचे मनापासून आभार!

## एकांकिका विभाग



१.आंतर आगार एकांकिका स्पर्धा २०२४-२५:- बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाच्या आंतर आगार ‘एकांकिका स्पर्धेची प्राथमिक फेरी ३० आणि ३१ ऑगस्ट २०२४ रोजी, रमेश रणदिवे कलादालन, आणिक आगार येथे संपन्न झाली. यातून पुढील ०९ एकांकिका अंतिम फेरी साठी निवडण्यात आल्या.

| अ क्र | एकांकिकांचे नाव | लेखकांचे नाव | विभाग | आगार |
|---|---|---|---|---|
| १ | हिंदवी प्रपातो कोसळावा | भालचंद्र कुबल | इमारत विभाग | गोरेगाव आगार |
| २ | आधे अधुरे | इरफान मुजावर | वाहतूक व माहिती तंत्रज्ञान विभाग | वडाळा आगार |
| ३ | तिचे संदर्भ नसलेली गोष्ट | अनंत अंकुश | परिवहन अभियांत्रिकी विभाग | गोराई आगार |
| ४ | बेडूका रमी आणि तुम्ही | विक्रांत मोडक | मेजर युनिट आणि मशिन शॉप | दादर कार्यशाळा |
| ५ | डेली सोप | समीर पेणकर | प्रवर्तन व परिरक्षन (मध्य उत्तर) | वडाळा आगार |
| ६ | कापूर | प्रसिध्दी सोनवणे | वीज ग्राहक ब विभाग | कुलाबा आगार |
| ७ | जब We मेट. | माधव साने | आंतर लेखा व वाहतूक विभाग | कुलाबा व मजास आगार |
| ८ | फोबिया | चैतन्य सरदेशपांडे | वाहतूक विभाग | कुलाबा आगार |
| ९ | फ्लाईंग राणी | मिलिंद बनसोडे | माहिती व तंत्रज्ञान विभाग | कुलाबा आगार |

सदर ०९ एकांकिकांची अंतिम फेरी मंगळवार दिनांक २४ सप्टेंबर २०२४ रोजी, अण्णाभाऊ साठे नाटयगृह, भायखळा येथे प्रचंड उत्साहात संपन्न झाली.

अंतिम फेरी साठी सुप्रसिध्द नाटय लेखक, दिग्दर्शक व प्रशिक्षक डॉ. अनिल बांदिवडेकर आणि ज्येष्ठ लेखक दिग्दर्शक श्री. विलास पागार यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

सभापती कला डॉ.राजेंद्र पाटसुते, सभापती क्रीडा श्री. धनंजय पवार, उप मुख्य अभियंता श्री.संजय अदलिंगे, सरचिटणीस कला श्री.विजय सूर्यवंशी, तसेच परीक्षक या मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.

नाटय सृष्टीतील दिलीप दळवी, श्रीनिवास नार्वेकर, संदीप विचारे, निनाद शेटे, विलास म्हामणकर, कय्यूम काझी, शाम अधटराव, रामदास तांबे, उमेश ठाकूर, वैश्यंपायन गमरे, उल्लेश खंदारे तसेच बेस्टचे विनोद आडे,शाहीर मधुकर खामकर, उदय दरेकर,नंदकुमार सावंत,रामदास विश्वासराव, जयंत सावंत, कांचन मेस्त्री,पांडुरंग दाभोळकर, प्रफुल्ल पुरोहित, सुनील केंजळे, विलास गाड इत्यादी मान्यवर कलाकार, अधिकारी व हितचिंतक तसेच बहुसंख्य नाटय रसिक प्रेक्षकांनी स्पर्धेला उपस्थित राहून कलाकारांना शुभेच्छा दिल्या.

## आंतर आगार एकांकिका स्पर्धा निकालपत्र - अंतिम फेरी २०२४-२५

### सर्वोकृष्ट एकांकिका

| अनु.क्र. | बक्षिस | एकांकिका | विभाग |
|---|---|---|---|
| १. | प्रथम | तिचे संदर्भ नसलेली गोष्ट | अभियांत्रिकी ,गोराई आगार |
| २. | द्वितीय | फोबिया | वाहतूक, कुलाबा |
| ३. | तृतिय | फ्लाईंग राणी | माहिती तंत्रज्ञान, कुलाबा |

### सर्वोकृष्ट दिग्दर्शन कै. रमेश रणदिवे स्मृती

| अनु.क्र. | बक्षिस | नाव (सर्वश्री) | एकांकिका | विभाग |
|---|---|---|---|---|
| ४. | प्रथम | दिनेश कानडे | तिचे संदर्भ नसलेली गोष्ट | परिवहन अभियांत्रिकी ,गोराई |
| ५. | द्वितीय | सचिन सावंत | फोबिया | वाहतूक, कुलाबा |

### सर्वोकृष्ट लेखक

| अनु.क्र. | बक्षिस | नाव (सर्वश्री) | विभाग | एकांकिका |
|---|---|---|---|---|
| ६. | प्रथम | माधव साने | आंतर लेखा व वाहतूक, कुलाबा | जब we मेट. |
| ७. | द्वितीय | प्रसिध्दी सोनावणे | वीज ग्राहक ब , कुलाबा | कापूर |

### सर्वोकृष्ट प्रकाशयोजना

| अनु.क्र. | बक्षिस | नाव (सर्वश्री) | विभाग | एकांकिका |
|---|---|---|---|---|
| ८. | प्रथम | प्रशांत सावंत | वीजग्राहक ब , कुलाबा | कापूर |
| ९. | द्वितीय | अजित सामंत | परिवहन अभियांत्रिकी ,गोराई | तिचे संदर्भ नसलेली गोष्ट |

## सर्वोकृष्ट पार्श्वसंगीत / संगीत

| अनु.क्र. | बक्षिस | नाव | विभाग | एकांकिका |
|---|---|---|---|---|
| १०. | प्रथम | चंद्रशेखर मोहिते | इमारत , गोरेगाव | हिंदवी प्रपातो कोसळावा |

## सर्वोकृष्ट नेपथ्य

| अनु.क्र. | बक्षिस | नाव (सर्वश्री) | विभाग | एकांकिका |
|---|---|---|---|---|
| ११. | प्रथम | नंदकुमार सावंत | इमारत , गोरेगाव | हिंदवी प्रपातो कोसळावा |
| १२. | द्वितीय | सचिन मांगेला | वाहतूक ,माहिती तंत्रज्ञान वडाळा | आधे अधुरे |

## सर्वोकृष्ट स्त्री कलाकार - कै. शरयू भोपटकर स्मृती

| अनु.क्र. | बक्षिस | नाव (सर्वश्रीमती) | विभाग | एकांकिका |
|---|---|---|---|---|
| १३. | प्रथम | प्रसिध्दी सोनावणे | वीजग्राहक ब, कुलाबा | कापूर |
| १४. | द्वितीय | संध्या पुरव | माहिती तंत्रज्ञान, कुलाबा | फ्लाईंग राणी |

## सर्वोकृष्ट पाहुणी स्त्री कलाकार

| अनु.क्र. | बक्षिस | नाव (सर्वश्री) | एकांकिका | विभाग |
|---|---|---|---|---|
| १५. | प्रथम | रंजना म्हाबदी | फोबिया | वाहतूक, कुलाबा |
| १६. | द्वितीय | श्वेता तांबे | जब We मेट. | आंतर लेखा व वाहतूक , कुलाबा व मजास |

## सर्वोकृष्ट अभिनय – पुरुष कलाकार

| अनु.क्र. | बक्षिस | नाव (सर्वश्री) | विभाग | एकांकिका |
|---|---|---|---|---|
| १७. | प्रथम | दिनेश कानडे | परिवहन अभियांत्रिकी ,गोराई | तिचे संदर्भ नसलेली गोष्ट |
| १८. | द्वितीय | रमण चव्हाण | वाहतूक, कुलाबा | फोबिया |
| १९. | तृतिय | सचिन म्हात्रे | मेजर युनिट आणि मशिन शॉप दादर | बेडूक रमी आणि तुम्ही |

## सर्वोकृष्ट हरहुन्नरी कलाकार - कै. अशोक कुलकर्णी स्मृती

| अनु.क्र. | बक्षिस | नाव (सर्वश्री) | एकांकिका |
|---|---|---|---|
| २०. | प्रथम | गणेश मिंडे | हिंदवी प्रपातो कोसळावा /फ्लाईंग राणी |

अभिनय उत्तेजनार्थ पारितोषिक – पुरुष / स्त्री
गुणानुक्रम नाही

| अनु.क्र. | नाव (सर्वश्री) | भूमिका | एकांकिका |
|---|---|---|---|
| १. | राजकुमार सावंत | कलाकार | हिंदवी प्रपातो कोसळावा / फ्लाईंग राणी |
| २. | सविंद नांदलस्कर | कलाकार | आधे अधुरे |
| ३. | मिलिंद कांबळे | कलाकार | डेली सोप |
| ४. | सचिन सावंत | कलाकार | जब वी मेट. |
| ५. | विकास परब | कलाकार | फ्लाईंग राणी |
| ६. | नितीन भोसले | कलाकार | डेली सोप |
| ७. | सौरभ लोंखडे | कलाकार | बेडूका रमी आणि तुम्ही |
| ८. | ऐश्वर्या कदम | कलाकार | आधे अधूरे |
| ९. | ममता शेडगे | कलाकार | फ्लाईंग राणी |
| १० | वीणा जावकर | कलाकार | फ्लाईंग राणी |

या स्पर्धेचे आयोजन उपसरचिटणीस कला 'संगिता पुरव' यांनी केले होते. तसेच स्पर्धा यशस्वी करण्यासाठी माधवी जुवेकर, संजय चौधरी, महेंद्र भांबिड, चारुदत्त वैद्य, भालचंद्र म्हात्रे, विजय कोळवणकर, सुरेश अढळराव, प्रमोद सुर्वे, सुनील खोबरेकर, प्रशांत सावंत, संतोष दळवी, श्याम शिंदे, शेखर कवळे, भूषण मेहेर, नंदकुमार सावंत, अनिकेत खैरे, वासुदेवा आंब्रे, सुशीर नांदलस्कर, अनिल गावडे, हर्षल पाटकर, प्रशांत धुमाळ, सचिन बेलिडगे, मिलिंद सावंत, रजनीकांत दराडे, भीमराव कोळी, अजय जाधव, मधुसूदन धेंडे, अनिल चौगुले, वैशाली पाटील, राजेश खोत यांनी विषेश परिश्रम घेतले.

## ललितकला व प्रदर्शन विभाग

१.रंगावली व सजावट स्पर्धा २०२४-२५ :- प्रतिवर्षानुसार बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाच्या ललित कला व प्रदर्शन विभागातर्फे दसरा स्नेह संमेलनानिमित्त शुक्रवार दिनांक ११.१०.२०२४ रोजी सकाळी ९.०० वाजता रंगावली व सजावट स्पर्धा २०२४ - २५ कॉन्फरन्स हॉल कुलाबा व विविध कार्यालयात स्पर्धा घेण्यात आली. मंडाळाचे उपाध्यक्ष सहाय्क्क महाव्यवस्थापक (वि.पु) श्री. बिलाल शेख यांनी 'अ' गट पुरूष आणि महिला 'अ' गट चित्ररांगोळी या दोन्ही चित्ररांगोळीचे कुलाबा कॉन्फरन्स हॉल येथील सभागृहात उदघाटन केले. त्याप्रसंगी उपक्रमातील अनेक वरिष्ठ अधिकारी व मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी मा. बिलाल शेख,उपाध्यक्ष - सहाय्यक महाव्यवस्थापक (वि.पु) यांनी सर्व रंगावली कलाकारांचे कौतुक केले यावेळी एकुण ११ स्पर्धकांनी सदर स्पर्धेत भाग घेतला होता. 'अ' गट पुरूष व ' अ' गट महिला तसेच 'ब'गट चित्ररांगोळी, संस्कारभारती, ठिपक्यांची रांगोळी, रांगोळी सदृष्य कलाकृती आणि सजावट स्पर्धा असे सर्व विभाग मिळून ५६ स्पर्धकांनी भाग घेतला होता.

सदर स्पर्धेकरिता परिक्षक म्हणून वरिष्ठ सेवानिवृत्त रंगावलीकार सर्वश्री धर्मपाल सुर्वे, जगदीश पेडणेकर, किशोर सावंत व कमलाकर सुर्वे यांनी काम पाहिले.

उपरोक्त स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे :

| 'अ' गट पुरुष – चित्ररांगोळी | | |
|---|---|---|
| बक्षिस | स्पर्धकांचे नाव - (सर्वश्री) | आगार/ विभाग |
| प्रथम क्रमांक | विशाल चव्हाण | चौथरे दादर कार्यशाळा |
| व्दितीय क्रमांक | संतोष अनभवणे | परि. अभि. मुलुंड |
| तृतिय क्रमांक | राकेश जाधव | परि. अभि. वडाळा |
| उत्तेजनार्थ – १ | यतिन पिंपळे | बेस्ट संग्रहालय आणिक |
| उत्तेजनार्थ – २ | निलेश होलमुखे | माहिती व तंत्रज्ञान - कुलाबा |
| 'अ' गट महिला – चित्ररांगोळी | | |
| बक्षिस | स्पर्धकाचे नाव - (सर्व श्रीमती) | आगार / विभाग |
| प्रथम क्रमांक | भारती कांबळी | साम्रगी व्यवस्थापन दादर |
| व्दितीय क्रमांक | भारती धामणकर | माहिती व तंत्रज्ञान बॅकबे |
| तृतिय क्रमांक | अश्विनी मोहीते | प्रकल्प वीजभवन |
| 'ब' गट पुरुषांसाठी चित्ररांगोळी (सामायिक विभाग ) | | |
| बक्षिस | स्पर्धकांचे नाव - (सर्वश्री/ श्रीमती) | आगार |
| प्रथम क्रमांक | अमोल कुलाळ | भविष्य निर्वाह निधी विभाग ,कुलाबा |
| व्दितीय क्रमांक | दिग्वीजय कदम | वाहतूक नियोजन विभाग ,वडाळा |
| तृतिय क्रमांक | सुनिल खेडेकर | परिवहन अभियांत्रिकी,गोरेगांव |
| उत्तेजनार्थ – १ | रुपाली रोकडे | मार्गप्रकाश - बांधणी,शिवडी टर्मिनस |
| उत्तेजनार्थ – २ | कैलास पवार | चौथरे परि.अभि. विभाग,दादर कार्यशाळा |

| | | |
|---|---|---|
| प्रशस्तीपत्र | सुहास दहिवलकर | विदयुत विभाग, दादर कार्यशाळा |
| प्रशस्तीपत्र | विनायक जोशी | चौथरे परि.अभि. विभाग,दादर कार्यशाळा |
| प्रशस्तीपत्र | अश्विनी सरमळकर | चौथरे परि.अभि. विभाग,दादर कार्यशाळा |
| प्रशस्तीपत्र | चक्षूपाल कांबळी | परिवहन अभियांत्रिकी कुर्ला आगार |
| प्रशस्तीपत्र | सुनिल चव्हाण | परिवहन अभियांत्रिकी कुर्ला आगार |
| 'ब' गट महिला – ठिपक्यांची रांगोळी (सामायिक विभाग) | | |
| बक्षिस | स्पर्धकांचे नाव - (सर्वश्री/ श्रीमती) | आगार |
| प्रथम क्रमांक | ज्योती जामसंडेकर | सुरक्षा व दक्षता विभाग कुलाबा |
| व्दितीय क्रमांक | स्नेहा साळवी | कामगार अधि.कार्यालय दादर कार्याशाळा |
| तृतिय क्रमांक | भारती क्षिरसागर | वाहतुक विभाग, शिवाजीनगर आगार |
| उत्तेजनार्थ – १ | संस्कृती माईनकर | आंतरलेखा परीक्षा विभाग, कुलाबा आगार |
| उत्तेजनार्थ – २ | छाया लिखार | पत्रव्यवहार विभाग, कुलाबा आगार |
| प्रशस्तीपत्र | मयुरी जाबरे | साम्रगी सेवा व्यवस्थापन विभाग,कुलाबा आगार |
| प्रशस्तीपत्र | रोहिणी बाईत | ग्राहक सेवा आस्थापन विभाग कुलाबा आगार |
| प्रशस्तीपत्र | मनिषा गुणागी | वाहतुक (मुख्य कार्यालय ) वडाळा |
| प्रशस्तीपत्र | श्वेताली लोटके | ग्राहक सेवा (फ/ दक्षिण प्रभाग) वडाळा |
| प्रशस्तीपत्र | वैशाली देसाई | वाहतूक कार्यालय वडाळा आगार |

‘ब’ गट महिला / पुरुष – संस्कारभारती रांगोळी (सामायिक विभाग )

| बक्षिस | स्पर्धकांचे नाव (सर्वश्री / श्रीमती) | आगार |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | प्रविण चौफेकर | वीजतंत्री परि.अभि. ओशिवरा |
| द्वितीय क्रमांक | गायत्री सरमळकर | मुख्य अभि. कार्या. कुलाबा |
| तृतिय क्रमांक | सायली चव्हाण | वाहतुक ,मुलुंड |
| उत्तेजनार्थ – १ | ज्योती हळगेकर | पर्यवेक्षिका (वै) साम्रगी व्यवस्थापन कुलाबा |
| उत्तेजनार्थ -२ | आसीफा पटेल | पर्यवेक्षिका (वै) अर्थसंकल्प विभाग कुलाबा |
| उत्तेजनार्थ -३ | अनुश्री पेवेकर | जेष्ठ डीसीओ माहिती तंत्रज्ञान (IT) कुलाबा |
| प्रशस्तीपत्र | भुर्पेद्र पाटील | जोडारी परि. अभि. धारावी |
| प्रशस्तीपत्र | बिपीन पाटील | नियोजन विभाग, कुलाबा |
| प्रशस्तीपत्र | सुचिता सावंत | ग्राहकसेवा (एफ/द) वडाळा |
| प्रशस्तीपत्र | सुरेखा शिंदे | पर्यवेक्षिका(एफ/उत्तर) वडाळा |
| प्रशस्तीपत्र | हर्षदा गभाळे | (उभारणी उत्तर,शिवडी) कसारा |
| प्रशस्तीपत्र | सुर्वणा खरात | ग्राहकसेवा (एफ/द) वडाळा |

‘ब’ गट महिला / पुरुष – सजावट (सामाईक विभाग)

| बक्षिस | स्पर्धकांचे नाव (सर्वश्री / श्रीमती) | आगार |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | सचिन मांगेला | विदयुत कार्य विभाग, वडाळा |
| द्वितीय क्रमांक | स्वप्नील मेस्त्री | परि. अभि. गोरेगांव |
| तृतिय क्रमांक | संदीप शेटये | मोटर वाहन विभाग, आाणिक आगार |
| उत्तेजनार्थ – १ | भरत पाटील | परि. अभि. मुलुंड आगार |
| उत्तेजनार्थ – २ | सौरभ लोखंडे | यंत्र उप विभाग परि.अभि दादर कार्यशाळा |
| उत्तेजनार्थ – ३ | अमित सारंग | तांत्रिक प्रशिक्षण केंद्र,वडाळा |
| प्रशस्तीपत्र | निलेश पोटे | लेखा विभाग, कुलाबा आगार |
| प्रशस्तीपत्र | निखील धुरी | आंतरलेखा परीक्षा , कुलाबा आगार |
| प्रशस्तीपत्र | सुचिता सावंत | ग्राहकसेवा (एफ/द प्रभाग) वडाळा |
| प्रशस्तीपत्र | विशाल पारकर | परि. अभि. मध्य मुंबई आगार |
| प्रशस्तीपत्र | नंदकुमार मोरे | प्रणाली संरक्षण/ मिटर्स विभाग, वडाळा |
| प्रशस्तीपत्र | मिलिंद भोईर | आगार प्रवर्तक वाहतुक कार्यालय कुर्ला आगार |
| प्रशस्तीपत्र | विशाल नाईक | परि. अभि. मुलुंड आगार |

ब’ गट महिला /– सदृष्य (सामाईक विभाग)

| बक्षिस | स्पर्धकांचे नाव (सर्वश्रीमती) | आगार |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | प्रज्ञा पटेल | लेखा विभाग, कुलाबा |

२. <u>रंगावली स्पर्धा २०२४-२५ पारितोषिक वितरण समारंभ -</u>

रंगावली व सजावट स्पर्धा २०२४-२५ चा पारितोषिक वितरण सभारंभ दिनांक २१/०३/२०२५रोजी दुपारी ३.०० वाजता रमेश रणदिवे कलादालन आणिक आगार येथे संपन्न झाला. माजी बेस्ट समिती अध्यक्ष माननीय श्री.अनिल कोकीळ, तसेच सुनीता तांबे ( लेखिका,कवयित्री) माधवी जुवेकर(अभिनेत्री), प्रशांत तावडे (वाहतूक अधिकारी) आणि भूपेश तारी (सुरक्षा अधिकारी), विजय सूर्यवंशी (सरचिटणीस कला), संगीता पुरव (उप सरचिटणीस कला), या उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कलाकारांना बक्षिसे प्रदान करण्यात आली.

संगीत व साहित्य विभाग

१. सुगम संगीत, अभंग गायन व नृत्य स्पर्धा-

कला आणि क्रीडा मंडळ "संगीत व साहित्य विभाग आयोजित" आंतर आगार सुगम संगीत गायन समूह गायन व अभंग गायन स्पर्धा दिनांक २०डिसेंबर २०२४ आणि दिनांक २४ डिसेंबर२०२४रोजी रमेश रणदिवे कलादालन आणिक आगार येथे फार मोठया उत्साहात संपन्न झाली. या स्पर्धेत ८० स्पर्धकांनी भाग घेतला होता, सदर स्पर्धेसाठी सुप्रसिध्द गायक 'श्री.रमेश राणे' आणि संगीत विषारद 'सौ. कल्पना कोठारे' यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले,

सदर स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे:-

: निकालपत्र :-

सुगम संगीत स्पर्धा

| अ. क्र | क्रमांक | स्पर्धकांचे नाव | पारितोषिक |
|---|---|---|---|
| १. | प्रथम | श्री. योगेश पाटील | सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख |
| २. | द्वितीय | श्री. सुशील पाटील | सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख |
| ३. | तृतीय | श्री. सुनील सावंत | सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख |
| ४ | उत्तेजनार्थ | निजाम अली सय्यद | प्रशस्तीपत्र व रोख |
| ५. | उत्तेजनार्थ | श्री. मंगेश गोसावी | प्रशस्तीपत्र व रोख |
| ६. | उत्तेजनार्थ | श्रीमती. नेहा येंधे | प्रशस्तीपत्र व रोख |
| ७. | प्रशस्तीपत्र | श्री. अरूण नाईक | प्रशस्तीपत्र |
| ८. | प्रशस्तीपत्र | श्री. अशोक थोरात | प्रशस्तीपत्र |
| ९. | प्रशस्तीपत्र | श्री. रमेश देखणे | प्रशस्तीपत्र |
| १०. | प्रशस्तीपत्र | श्री. विनोद इंगळे | प्रशस्तीपत्र |

अभंग गायन स्पर्धा

| अ.क्र. | क्रमांक | स्पर्धकांचे नाव | पारितोषिक |
|---|---|---|---|
| १. | प्रथम | श्री. सुनील सावंत | सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख |
| २. | द्वितीय | श्री. मंगेश गोसावी | सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख |
| ३. | तृतीय | श्री. सुशीर नांदलस्कर | सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख |
| ४. | उत्तेजनार्थ | श्री. योगेश पाटील | प्रशस्तीपत्र व रोख |
| ५. | उत्तेजनार्थ | श्री. विजय आयरे | प्रशस्तीपत्र व रोख |
| ६. | उत्तेजनार्थ | श्रीमती. नेहा येंधे | प्रशस्तीपत्र व रोख |
| ७. | प्रशस्तीपत्र | निजाम अली सय्यद | प्रशस्तीपत्र |
| ८. | प्रशस्तीपत्र | श्री. दिनेश पाटील | प्रशस्तीपत्र |
| ९. | प्रशस्तीपत्र | श्री. सरिता सेंगर | प्रशस्तीपत्र |

<u>समुह गायन स्पर्धा</u>

| अ.क्र. | क्रमांक | समुहाचे नाव | पारितोषिक |
|---|---|---|---|
| १. | प्रथम | पाठकवाडी रॉक्स | सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख |
| २. | द्वितीय | सप्तसूर | सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख |
| ३. | तृतीय | स्वरसागर | सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख |
| ४. | उत्तेजनार्थ प्रथम | फ्रेश आय. टी. बँड | प्रशस्तीपत्र व रोख |
| ५. | उत्तेजनार्थ द्वितीय | सुमधुर गायक | प्रशस्तीपत्र व रोख |
| ६ | उत्तेजनार्थ तृतीय | हंगामा गृप | प्रशस्तीपत्र व रोख |

सदर विजयी स्पर्धकांना सन्माननीय परिक्षक श्री.रमेश राणे आणि सौ. कल्पना कोठारे, सरचिटणीस कला श्री.विजय सूर्यवंशी, उप सरचिटणीस कला संगीता पुरव यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.या स्पर्धेला बेस्ट मधिल सेवानिवृत्त गायक कलाकार सौ.माधुरी करंडे, सौ.भारती क्षिरसागर, श्री. गणेश जांभे आणि श्री.नंदकुमार पोळ आवर्जुन उपस्थित राहिले.या स्पर्धा कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.उदय हाटले यांनी केले.

या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मानद् सचिव सुनील खोबरेकर, अविरत साळवी,यतीन पिंपळे, संतोष दळवी, श्याम शिंदे , रियाज पठाण, धनाजी शेडगे, दिलीप लिगम, अनिल चौगुले, मधुसूदन धेंडे आणि संदेश कांबळे यांनी मेहनत घेतली. तसेच स्पर्धकांना वाद्यांची साथ शेखर कवळे, सुशीर नांदलस्कर, संदीप डावरे, रोशन कांबळे, सतीश इडेकर यांनी दिली.नृत्य स्पर्धकांचा सहभाग प्रतिसाद कमी मिळाल्याने यंदा नृत्य स्पर्धा रद्द करण्यात आली.

२ <u>दिनांक २६ जानेवारी २०२५-</u> दिनांक२६ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहनाचा कार्यक्रम आपल्या बेस्ट कुलाबा आगार येथील मोकळ्या आवारात सादर करण्यात आला. या कार्यक्रमात आपल्या बेस्टचे सुरक्षा दक्षता विभागाच्या कर्मचारी आणि अधिकारी यांनी बेस्ट ब्रास बँण्ड

पथकाच्या सहीत परेड संचलन करत आपल्या देशाच्या ध्वजाला मानंवदना दिली. त्यावेळेसआपल्या बेस्टच्या महाव्यवस्थापक डॉ.अश्विनी जोशी,(भाप्रसे) यांनी ध्वज फडकावून मानवंदना दिली. या कार्यकमात सुरक्षा दक्षता विभागातील सर्व कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाला बेस्ट ब्रास बॅड पथकातील कर्मचारी यांनी बॅड चे सादरीकरण चांगल्या प्रकारे पार पाडले. या प्रसंगी आपल्या मंडळाचे पदाधिकारी म्हणून श्री.विजय सूर्यवंशी –सरचिटणीस कला, श्री.सुनिल खोबरेकर मानद् सचिव – संगित व साहित्य विभाग, श्री.संतोष दळवी – मानद् सचिव ललित कला व प्रदर्शन विभाग ,श्री.शेखर कवळे - माजी मानद् सचिव – संगित व साहित्य विभाग या कायक्रमाला उपस्थित होते.

बेस्ट ब्रास बँड पथक' खालीलप्रमाणे -

| अ.क्र | नांव | परि.क्र. | वे.पृ | आगार/विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | सुशीर नांदलस्कर | ००४१२४ | ३७/१० | वाहतूक मरोळ |
| २ | रमेश म्हात्रे | ०९६२११ | ३७/३८ | वाहतूक मालाड |
| ३ | प्रसाद कोळी | ०११४०८ | ३७/३८ | वाहतूक मालाड |
| ४ | निलेश भंडारी | १०९३३१ | ३५/३८ | वाहतूक मालाड |
| ५ | लंकेश कोळी | ००७७३३ | ३७/३८ | वाहतूक मालाड |
| ६ | देवेंद्र घरत | ११३४८० | ३२/३४ | वाहतूक गोराई |
| ७ | विश्वनाथ घरत | ०११३४५ | ३२/५४ | वाहतूक गोराई |
| ८ | सुनिल घरत | ११४८१३ | ३५/३४ | वाहतूक गोराई |
| ९ | मयुरेश राऊत | १११३४२ | ३५/२९ | वाहतूक मागाठाणे |
| १० | सुशांत पाटील | ११११०३ | ३२/२९ | वाहतूक मागाठाणे |
| ११ | संजय आक्रे | ११३५३० | ३५/१९ | वाहतूक वांद्रे |
| १२ | बाळासाहेब लंकेश्वर | ११३८८५ | ३२/१९ | वाहतूक वांद्रे |
| १३ | हर्षल कोळी | ३२७७११ | ५५/१९ | परि. अभि. वांद्रे |
| १४ | विजय वैती | ००६०८१ | ३७/११ | वाहतूक देवनार |
| १५ | मनिष माहिमकर | ११३०२८ | ३५/०२ | वाहतूक वडाळा |
| १६ | संदिप परब | ०१३२९३ | २२/०२ | वाहतूक वडाळा |
| १७ | विनोद उमप | ०१२९२६ | ३७/०२ | वाहतूक वडाळा |
| १८ | उमेश आक्रे | ११३५२२ | ३५/०५ | वाहतूक सातांकुझ |
| १९ | सचिन बाईत | ०१५११९७ | २२/०६ | वाहतूक कुर्ला |
| २० | विशाल केदारे | ११३४९१ | ३२/०७ | वाहतूक वरळी |
| २१ | जितेंद्र पगारे | ११४०७८ | ३२/१६ | वाहतूक बॅकबे |
| २२ | शैलेश वैती | ३२६८७९ | ५५/१७ | परि. अभि. गोरेगांव |
| २३ | राजाराम भानजी | ४१३१५९ | ४५०/२६ | आणिक प्र व प (उ/पू) |
| २४ | राजेंद्र तरे | ४१२६१७ | ४२८/०९ | आणिक उभारणी उ |
| २५ | ईश्वर गटटे | २८०६८६ | ०१०/०१ | ति व रो कुलाबा |
| २६ | उमेश शिंदे | १०७४८१ | ३५/१९ | वाहतूक वांद्रे |
| २७ | संदेश घरत | १९८१८१ | ३५/०८ | वाहतूक पोईसर |
| २८ | धनाजी शेडगे | ०१३३४९ | ३७-२९ | वाहतूक मागाठाणे |
| २९ | शेखर कवळे | | | |

३. काळा घोडा कला महोत्सव २०२४ - २५ -

दिनांक २८ जानेवारी २०२५ रोजी'काळा घोडा कला महोत्सव २०२४-२५' मध्ये बेस्ट ब्रास बॅंड पथकाचे सादरीकरण कुपरेज बॅंड स्टॅन्ड उद्यान, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर येथे अत्यंत उत्साहात पार पडले. बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाचे सभासद यांनी 'बेस्ट ब्रास बॅण्ड' चे उत्तम प्रकारे सादरीकरण केले. या प्रसंगी आपल्या मंडळाचे पदाधिकारी म्हणून सुदास सावंत - जन संपर्क अधिकारी, अशोक सांगळे मनोरंजन पर्यवेक्षक, श्रीमती. संगिता पुरव उप सरचिटणीस - कला , विजय सूर्यवंशी –

सरचिटणीस  कला, सुनिल खोबरेकर मानद् सचिव – संगित व साहित्य, संतोष दळवी– मानद् सचिव ललित कला व प्रदर्शन, श्री. शेखर कवळे - माजी मानद् सचिव – संगित व साहित्य तसेच 'काळा घोडा कला महोत्सवाचे आयोजक' प्रमुख  मान्यवर म्हणून श्री. रवि मिश्रा, व श्रीमती. वर्षा कारळे,या सदर प्रसंगी उपस्थित होते. बेस्ट ब्रास बॅड पथकामध्ये अधिकतर कर्मचारी हे बसचालक आणि बस वाहक असल्याने प्रेक्षकांकडून त्यांची खूपच वाहवा झाली. आयोजकांनी आपल्या बेस्ट ब्रास बॅण्ड पथकाची भरभरून स्तृती केली.आयोजकाच्या वतीने बेस्ट कला  आणि क्रीडा मंडळाला मानधन  देऊन गौरव केला.

### ववविध करमणूक विभाग

१   <u>एका लग्नाची  पुढची गोष्ट- </u>.ZEE मराठी प्रस्तुत प्रशांत दामले फॅन फाऊंडेशन गौरी थिएटर्स निर्मित 'एका लग्नाची पुढची गोष्ट'  कथा इम्तियाझ पटेल  लेखक दिग्दर्शक अद्वैत दादरकर  अभिनीत व  कविता मेढेंकर  आणि प्रशांत दामले  याची प्रमुख भुमिका असलेले व्यावसायिक नाटकाचा एक प्रयोग शुक्रवार दिनांक  ३ जानेवारी २०२५रोजी रात्रौ  ८.३० वाजता  यशवंत  नाटय मंदिर माटुंगा  येथे सादर झाला. सर्व सभासद कर्मचारी / सभासद/  अधिकारी वर्गाने प्रचंड टाळ्यांचा कडकडाट करून या नाटकाला दाद देत मनमुराद आनंद लुटला.

टिप :  या नाटकाच्या प्रयोग हाऊस फुल झाल्याबद्दल सर्व सभासद, कर्मचारी आणि अधिकारी यांचे विशेष आभार.

२ <u>"इवलेसे  रोप" (मराठी व्यावसायीक नाटक) :-</u>

बेस्ट कला  आणि क्रीडा  मंडळाच्या  वतीने  सभासदांना  दर्जेदार  व्यावसायिक  नाटकं  कुटुंबासह सवलतीच्या दरात पाहता यावीत. या उद्द्ष्टिाने विभागावर व्यावसायिक नाटकांचे प्रयोग सातत्याने आयोजित करण्यात येत  असतात  आणि त्या नाटय प्रयोगांना  बेस्टच्या प्रेक्षकांचाही उदंड प्रतिसाद  लाभत असतो.

'स्पर्श,'  'चष्मेबद्दूर',  'कथा'   'दिशा'    'पपिहा',  'साज' यासाख्या  वेगळ्या धाटणीचे चित्रपट आणि दर्जेदार  व्यावसायिक नाटकांद्वारे,रसिक  प्रेक्षकांच्या मनामध्ये आपला वेगळा ठसा उमटविण्या-या, राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या सुप्रसिध्द ज्येष्ठ लेखिका आणि दिग्दर्शिका 'सई परांजपे'यांनी तब्बल १३ वर्षांनी पुन्हा एकदा  लेखन दिग्दर्शन केलेल्या व सुप्रिध्द अभिनेते 'मंगेश कदम' आणि 'लीना'भागवत' यांच्या प्रमुख भुमिका असलेलं, सध्या गाजत असलेलं अनेक पुरस्कारांनी गौरविलेलं, प्रत्येक प्रेक्षकांनी पाहावयास हवं असं 'लवलेसे रोप' हे नाटक प्रक्षेकांच्या हवाली केलं.

'नांत' या शब्दाची जादूच वेगळी आहे. नातं  पिकलं  की अधिक गोड होतं. ते छान चांगलं डोलदार बहारावं यासाठी त्यात प्रेमाचं आणि विश्वासाचं खतपाणी घालावं लागतं. अश्याचं एका मुरलेल्या नात्याची खुमासदार गोष्ट सांगणारं नाटक म्हणजे 'इवलेसे रोप' ह्या नाटकाचा प्रयोग गुढीपाडव्याच्या पूर्व संध्येला म्हणजेच शनिवार दिनांक २९.०३.२०२५ रोजी नवीन वर्षाच्यानिमित्त विष्णू दास भावे नाटयगृह वाशी संध्याकाळी ८.०० वाजता सादर करण्यात आला.

उपरोक्त दोन्ही नाटकाचे प्रयोग यशस्वी होण्यासाठी श्री. प्रशांत सावंत मानद् सचिव –विविध करमणूक, श्री.विजय सूर्यवंशी सरचिटणीस - कला, संगिता पुरव उप सरचिटणीस -कला, अशोक सांगळे मनोरंजन पर्यवेक्षका, यांचे कार्यालयीन सहकार्य लाभले. श्री.विलास विचारे, श्री विमोचन देवळेकर, श्री. किरण राऊळ श्री. रुपेश पाडावे, श्री.भूषण मेहेर, श्याम शिंदे मौलाचे सहकार्य लाभले.

क्रीडा विभाग

मैदानी खेळ



१. पहिल्या साऊथ एशियन मास्टर्स ओपन ॲथलेटिक्स चॅम्पियनशीप :- दिनांक १०,११ व १२ जानेवारी २०२५ रोजी ठिकाण – मंगला स्टेडियम, मंगळूरू, कर्नाटक, भारत येथे पहिल्या साऊथ एशियन मास्टर्स ओपन ॲथलेटिक्स चॅम्पियनशीपचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेत भारतासहित श्रीलंक, भूतान, बांगलादेश, नेपाळ, या देशातील १७०० महिला व पुरुष खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत बेस्टच्या ९ खेळाडूंनी सहभाग घेऊन पुरुष खेळाडूंनी प्राविण्य मिळवले.

खेळाडूंची सविस्तर माहिती:

४३वी राष्ट्रीय मास्टर्स मैदानी खेळ स्पर्धा २०२४: दिनांक २६ ते २८ एप्रिल २०२४ रोजी सोमय्या कॉलेज

| अ.क्र | विजेत्याचे नाव | वयोगट | स्पर्धेचा प्रकार | पदक |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. राजेश पवार | ४५+ | ४००सांघिक धावणे, १००सांघिक धावण४००मी.धावणे,१०० मी.,२०० मी., | २कास्य,चौथा, पाचवा पाचवा |
| २. | श्री. अमोल म्हात्रे | ४५+ | गोळा फेक, थाळी फेक, हातोडा फेक, भाला फेक, | कास्य,पाचवा, सहावा, आठवा |
| ३. | श्री.अजय गुप्ता | ४५+ | ८००मी. धावणे,१५००मी.धावणे, १००००मी. धावणे, ५०००मी धावणे | कास्य,चौथा, पाचवा , सहावा |
| ४. | प्रकाश धस | ४०+ | १०,०००मी. धावणे ५००० मी धावणे १५००मी धावणे., ८००मी. धावणे | पाचवा,पाचवा, आठवा, आठवा |
| ५. | समाधान कोळी | ३५+ | १०,०००मी.५००० मी. १५००मी. धावणे,८००मी.धावणे | पाचवा,पाचवा, पाचवा, पंधरावा |
| ६. | नितीन कुराडे | ४०+ | भाला फेक, थालीफेक, गोळा फेक, | चौथा, सातवा, नववा |
| ७. | श्रीमती शिला शिरटावले | ४०+ | १५००मी.धावणे, ४००मी,धावणे, तिहेरी उडी, लांब उडी | चौथी, पाचवी, पाचवी, सहावी |
| ८. | भाग्यश्री पै | ५५+ | ५०००मी.चालणे, थाळी फेक, भाला फेक, | सहावी, नववी,नववी |
| ९. | मनीषा गुणागी | ५०+ | हातोडा फेक, थाळी फेक, गोळा फेक, | सहावी,नववी, तेरावी |

ॲथलेटिक्स ग्राउंड, विद्याविहार येथे '४३वी राष्ट्रीय मास्टर्स मैदानी खेळ स्पर्धा २०२४ पार पडली. या स्पर्धेत बेस्ट मैदानी खेळ संघातील खेळाडूंनी पुढीलप्रमाणे कामगिरी केली.

| अ.क्र | विजेत्याचे नाव | वयोगट | स्पर्धेचा प्रकार | पदक |
|---|---|---|---|---|
| १. | प्रतिक्षा शेलार | ४५+ | १००मी. धावणे,१००मी अडथळा शर्यत,४००मी.धावणे, | ४सुवर्ण पदक |
| | | | ४०० मी. सांधिक धावणे | |
| २. | शिला शिरटावले | ४०+ | १५००मी.धावणे,लांब उडी,तिहेरी उडी, ४००मी. सांधिक धावणे | ३रौप्य,१सुवर्ण |
| ३. | कल्पना भोसले | ५०+ | तिहेरी उडी, गोळा फेक, | २रौप्य पदक |
| ४. | मनीषा गुणागी | ५०+ | हातोडा फेक, गोळा फेक, | रौप्य , कास्य |
| ५. | किर्ती पाडळकर | ५०+ | ५०००मी. चालणे. | कास्य पदक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६. | भाग्यश्री पै | ५५+ | ५०००मी. चालणे. | कास्य पदक |
| ७. | निता कदम | ५५+ | १००मी.धावणे | कास्य पदक |
| ८. | अजय गुप्ता | ४५+ | १००००मी.धावणे, ५०००मी.धावणे, १५००मी.धावणे | ३सुवर्ण |
| ९. | ओंकार कदम | ३०+ | ११०मी.अडथळा शर्यत, ४००मी.अडथळा शर्यत, ४००मी संधिक १६००मी संधिक धावणे | सुर्वण, रौप्य, २सुवर्ण |
| १०. | भुषण थोरात | ३५+ | ११०मी. अडथळा शर्यत, लांब उडी, | सुवर्ण कास्य, |
| ११. | नितीन कुराडे | ३५+ | हातोडा फेक, भाला फेक, | रौप्य, कास्य |
| १२. | समाधान कोळी | ३५+ | १०००० मी.धावणे,५०००मी. धावणे | २ कस्य पदक |
| १३. | अमोल म्हात्रे | ४५+ | गोळा फेक, | कस्य पदक |
| १४. | अशोक बगाड | ४०+ | हातोडा फेक | कस्य पदक |
| १५. | अमरशील पवार | ५०+ | हातोडा फेक | कस्य पदक |

२.ऑल इंडिया पब्लिक बस ट्रान्सपोर्ट ॲथलेटिक्स (ASRTU ) २०२४ :-

| अ.क्र | विजेत्याचे नाव | वयोगट | स्पर्धेचा प्रकार | पदक |
|---|---|---|---|---|
| १. | प्रतिक्षा शेलार | ४५+ | १००मी. धावणे,२००मी धावणे | २सुवर्ण पदक |
| २. | कल्पना भोसले | ५०+ | १०००मी.चालणे | सुवर्ण पदक |
| ३. | किर्ती पाडळकर | ५०+ | १०००मी.चालणे | रौप्य पदक |
| ४. | भाग्यश्री पै | ५५+ | ४००मी. चालणे. | रौप्य पदक |
| ५. | शिला शिरटावले | ४०+ | ४००मी. धावणे, | कास्य पदक |
| ६. | राजेश पवार | ४५+ | २००मी.धावणे , ४००मी.धावणे | चौथा, अंतिम फेरीत बाद |
| ७. | प्रकाश धस | ४०+ | ८००मी. धावणे,१५००मी.धावणे | सहावा ,पाचवा |
| ८. | नितीन कुराडे | ३५+ | भाला फेक, गोळा फेक | सहावा, दहावा |
| ९. | अमोल म्हात्रे | ४५+ | गोळा फेक, थाळी फेक | सहावा , सातवा |
| १०. | भुषण थोरात | ३५+ | १००मी.धावणे ,लांब उडी | पहिल्या फेरीत बाद, आठवा |
| ११. | अमरशील पवार | ५०+ | ४००मी.धावणे , लांब उडी | पहिल्या फेरीत बाद, अकरावा |

असोशिएशन ऑफ स्टेट रोड ट्रान्सपोर्ट अंडरटेकींग, नवी दिल्ली यांच्या अधिपत्याखाली 'ऑल इंडिया पब्लिक बस ट्रान्सपोर्ट ॲथलेटिक्स मीट २०२४ चे दिनांक ०६.१२.२०२४ ते ०८.१२.२०२४ रोजी ठिकाण - पोलीस परेड मैदान, विशाखा पट्टणम येथे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत १९ एस.टि.यु. संघाचे २६६ पुरुष व १३६ महिला खेळाडूंनी सहभाग घेतला सदर स्पर्धेत बेस्टच्या ११ खेळाडूंनी सहभाग घेऊन महिला खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले. तर पुरूष खेळाडूंनी इतर संघाच्या २३ते ३०वयाच्या पुरूष स्पर्धकांशी झुंज देऊन दुस-या – तिस-या फेरीपर्यंत मजल मारली.

## बेस्ट संघाच्या खेळाडूंची सविस्तर कामगिरी

आपल्या बेस्ट संघाची सर्वात वेगवान खेळाडू श्रीमती. प्रतिक्षा शेलार ही स्पर्धेतील ४०० खेळाडूंची चाहती झाली. तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत होता. तसेच संपूर्ण वैयक्तिक क्रीडा प्रकारात दोन सुवर्ण पदक पटकावणारी ती एकमेव विजेती ठरली. दिल्ली येथे कार्यरत असलेले बेस्ट चे अधिकारी श्री.पवन जामोदकर साहेबांनी तिचे विशेष कौतुक केले. तर संपूर्ण स्पर्धेदरम्यान त्यांनी बेस्ट संघाचा उत्तम सहकार्य

केले. मैदानी खेळ संघास ए.एस.आर स्पर्धेत सहभागी होण्यासाठी बेस्ट उपक्रम तसेच बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाने संधी दिल्याबद्दल व सहकार्य केल्याबद्दल त्यांचे मनापासून आभार

३. <u>८८वी वार्षिक मैदानी खेळ स्पर्धा २०२४-२५ :-</u> मैदानी खेळ विभागातर्फे सन २०२४-२०२५ ची वार्षिक अंतर्गत मैदानी खेळ स्पर्धा दिनांक. १० व ११ मार्च २०२५ रोजी मुंबई विदयापीठ संकूल मैदान, मरिन लाईन्स येथे आयोजित करण्यात आली. या स्पर्धेचे उद्घाटक मान. श्री.राजेश अ.गंधेवार (मुख्य अभियंता स्थापत्य) यांच्या शुभहस्ते स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला. तद्प्रसंगी श्री. सुदास सावंत (उपसरचिटणीस - क्रीडा) श्री.अशोक सांगळे (मनोरंजन पर्यवेक्षक) तसेच इतर विभागाचे मानद् सचिव उपस्थित होते. श्री. राजेश पवार (मानद् सचिव मैदानी खेळ) यांनी प्रमुख पाहुणे, क्रीडा विभागाचे पदाधिकारी, खेळाडू व क्रीडा प्रेमींचे स्वागत केले. उद्घाटन पर भाषणात श्री. राजेश अ.गंधेवार यांनी त्यांच्या किशोर वयात मैदानी खेळात सहभागी झालेल्या काही आठवणी सांगून सर्व उपस्थित खेळाडूंना शुभेच्छा दिल्या व संघातील सर्व खेळाडूंचे कौतुक केले.

दोन दिवस पार पडलेल्या या स्पर्धेत२८ वैयक्तिक व २ सांघिक क्रीडा प्रकारात १४४ पुरष व ११ महिला खेळाडूंनी सहभाग घेतला श्री जया देवाडीगा, श्री,जय मोर्या, श्री रूपेश कडू, श्री सिध्देश राणे, व श्रीमती सुषमा पाटील यांनी पंच म्हणून पाहिले. त्यांना सहाय्यक म्हणून सर्वश्री उल्हास नफे,माजी खेळाडू - अनंत देसाई व धर्मेश शेट्टी यांनी मदत केली. तर श्रीमती. भाग्यश्री पै, श्रीमती वंदना अमिन श्री.आचरेकर यांनी खेळाडूंची नोंदणी, निकालांचे संकलन व प्रमाणपत्र लिहीणे इत्यादी कामे करण्यात .महत्त्वाचा वाटा उचलला.स्पर्धेत श्री. बाळू पाटील यांनी उत्तम प्रकारे समालोचन केले.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ मंगळवार दिनांक ११ मार्च २०२५ रोजी पार पडला.प्रमुख पाहूणे श्री.सुनील ना. भिंगे (उपमुख्य अभियंता कार्ये) यांनी उपस्थि ती दर्शवून रस्सीखेच आणि ४x१०० मी.सांधिक धावण्याच्या अंतिम स्पर्धेतील खेळाडूंना प्रोत्साहन देऊन त्यांचे मनोबल उंचावले.पारितोषिक समारंभासाठी श्री.तुषार शेळोकर (सह.अभियंता उभारणी) व श्री. मोहन गुरव (दुय्यम अभियंता बांधणी) हे उपस्थित होते.तंद्प्रसंगी श्री.मोहन गुरव यांनी भाषणात अध्यात्मक खेळाडूंची प्रगती यावर सुंदर माहिती दिली. प्रमुख पाहूणे सुनील भिंगे यांनी भाषणात सर्व विजेत्यांचे कौतूक केले,पुढील वाटचाली करिता शुभेच्छा दिल्या.

तत्पूर्वी रविवार दिनांक ९ मार्च २०२५ रोजी परेल वसाहत मैदान येथे कर्मचारी व अधिकारी यांच्या मुलांच्य मैदानी खेळ स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत ७५ मुला – मुलींनी उत्फूर्तपणे सहभाग घेऊन स्पर्धा यशस्वी रित्या पार पडली. स्पर्धा आयोजन दरम्यान परेल कर्मचारी वसाहत अध्यक्ष श्री. गायकर, श्री.सजंय कदम तसेच कला व क्रीडा विभागाचे सर्व

श्री रूपेश पाडावे, यांनी अनमोल सहकार्य केले. स्पर्धा पारितोषिक वितरण श्री.अनिल कोकीळ (माजी चेअरमन बेस्ट समिती) यांच्या हस्ते पार पडला.

उपरोक्त वार्षिक मैदानी खेळ स्पर्धामूधील प्रमुख विजेत्यांचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र | स्पर्धेचे नांव | चषकाचे नाव | विजेत्याचे नांव | आगार |
|---|---|---|---|---|
| १ | पुरुष अजिंक्यपद | कै. को. रा. आ. शेट्टी स्मृती चषक | भूषण थोरात | धारावी |
| २ | महिला अजिंक्यपद | कै. को. रा. आ. शेट्टी स्मृती चषक | प्रतिक्षा शेलार | वडाळा |
| ३ | पुरुष उपविजेतेपद | —————— | प्रकाश धस | दादर |
| | | —————— | | धारावी |
| ४ | महिला उपविजेतेपद | —————— | शिला  शिरटावले | वडाळा |
| ५ | ४x१०० मी. सांधिक धावणे | —————— | | दिंडोशी |
| ६ | रस्सीखेच विजेता संघ | श्रीमती पद्मावती भालेराव चषक | | सांताक्रुझ |
| ७ | आगार विजेता संघ | श्रीमती पद्मावती भालेराव चषक | | वडाळा |

सदर वार्षिक मैदानी खेळ स्पर्धेमधून सन २०२५- २६ करिता बेस्ट मैदानी खेळ संघ खालीलप्रमाणे : -

| क्र | महिला संघ (सर्व श्रीमती) | अ.क्र | पुरूष संघ (सर्व श्री) |
|---|---|---|---|
| १ | प्रतिक्षा शेलार | १ | भूषण थोरात |
| २ | शिला  शिरटावले | २ | प्रकाश धस |
| ३ | कल्पना भोसले | ३ | राजेश पवार |
| ४ | भाग्यश्री पै | ४ | अजय गुप्ता |
| ५ | शितल मर्ढेकर | ५ | अमोल म्हात्रे |
| ६ | मनिषा गुणागी | ६ | विक्रम पोळ |

| राखीव खेळाडू (फक्त सरावासाठी) | | | |
|---|---|---|---|
| १ | रिजवाना चौगुले | १ | दिंगबर भोसले |
| २ | किर्ती पाडळकर | २ | जिर्तेद्र कोळी |
| | | ३ | नितीन कु-हाड |
| | | ४ | समाधान कोळी |

प्रशिक्षक :  अमरशील पवार

बॅडमिंटन विभाग



१.वार्षिक अंतर्गत बॅडमिंटन स्पर्धा २०२४-२५- या कामगार कल्याण भवन प्रभादेवी येथे दि. ०३०३.२५ ते दिनांक ०७.०३.२०२५, (सार्वजनिक सुट्टी व साप्ताहिक रजा सोडून) या दरम्यान पार पडल्या. सदर स्पर्धा पुरुष एकेरी, महिला  एकेरी, पुरुष दुहेरी, महिला दुहेरी व मिश्र दुहेरी  व कामगार  मुले एकेरी, या खेळ प्रकारात खेळविण्यात आल्या.

सदर स्पर्धेचे उद्घाटन श्री.रंजन चौधरी माजी सदस्य, बेस्ट समिती यांच्या शुभहस्ते दिनांक ०३.०३.२०२५ करण्यात आले.सदर उद्घाटन प्रसंगी सर्वश्री. क्रीडा प्रमोद यादव –सरचिटणीस - क्रीडा,

सुदास सांवत -उप सरचिटणीस – क्रीडा, सुर्यकांत भोपी – मा.सचिव ( फुटबॉल), सुनिल शिंदे - मा.सचिव (हॉकी), शिवकुमार गोसाई मा.सचिव (हॉलीबॉल), श्री. हेमंत आरोलकर माजी मानद् .सचिव (बँडमिंटन) सौ. प्रणिता रावराणे - मा.स्वीकृत सदस्य यांची उपस्थिती लाभली.

श्री.सचिन भारती हे पुरुष एकेरी अजिंक्य पदाच्या जे.बी डीसोझा चषकाचे मानकरी ठरले तर महिला एकेरी अजिंक्य पदाचा जयमाला गोडबोले चषक सौ.सायली परब यांनी पटकाविला.उपरोक्त स्पर्धेत काही अनुभवी व होतकरू खेळाडुंनी क्रीडा खालिल प्रमाणे नैपूण्य प्रस्थापित केले.

| अ.क्र. | स्पर्धेचा प्रकार | निकाल | खेळाडूंचे नांव |
|---|---|---|---|
| १. | पुरुष एकेरी | उपविजेता | श्री. दिपक दमानिया |
| | | उपांत्य फेरी | श्री. दिनेश पांडे, |
| | | | श्री. सुदास सावंत |
| २. | महिला एकेरी | उपविजेती | सौ. संगीता जाधव |
| | | उपांत्य फेरी | सौ. श्रावणी ढापरे |
| | | | सौ. विशाखा बोरकर |
| ३. | पुरुष दुहेरी | विजेता | श्री. दिनेश पांडे, |
| | | | श्री. नंदकिशोर तावडे |
| | | उपविजेता | श्री. गणेश शिंदे |
| | | | श्री. प्रकाश धस |
| | | उपांत्य फेरी | श्री. विरेंद्र तावडे |
| | | | श्री. गोपाळ मिरजकर |
| | | उपांत्य फेरी | श्री. दिपक दमानिया |
| | | | श्री. अनिल तारिहाळकर |
| ४. | महिला दुहेरी | विजेत्या | सौ.श्रावणी ढापरे |
| | | | सौ. विशाखा बोरकर |
| | | उपविजेत्या | सौ. संगीता जाधव |
| | | | सौ. सुनीता साखरे |
| ५. | मिश्र दुहेरी | विजेते | श्री. दिनेश पांडे |
| | | | सौ. स्विटी मेंडोसा |
| | | उपविजेते | श्री. गोपाळ मिरजकरे |
| | | | सौ. सायली परब |
| | | उपांत्य फेरी | श्री. दिपक दमानिया व |
| | | | सौ. सीमा बागवे |
| | | उपांत्य फेरी | श्री.रोहित दांडेकर |
| | | | सौ. श्रावणी ढापरे |
| ६. | कामगार मुले एकेरी | विजेता | कु. कुणाल सावंत |
| | | उपविजेते | कु. पार्थ बिर्जे |

<u>निवड समितीने जाहीर केलेला २०२५ – २०२६ बॅडमिंटन संघ पुढीलप्रमाणे</u> :-

पुरुष संघ (सर्वश्री)

| अ.क्र | नाव | अ.क्र | नाव | अ.क्र | नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | सचिन भारती | २. | दिपक दमानिया | ३. | दिनेश पांडे |
| ४. | सुदास सांवत | ५. | गणेश शिंदे | ६. | विवेक जाधव |
| ७ | विरेंद्र तावडे | ८ | श्री.रोहित दांडेकर | ९. | श्री. प्रकाश धस |
| १० | शैलेश बिर्जे | | | | |

## महिला संघ (सर्व श्रीमती)

| अ.क्र | नाव | अ.क्र | नाव | अ.क्र | नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | सायली परब | २. | संगीता जाधव | ३. | श्रावणी ढापरे |
| ४. | विशाखा बोरकर | ५. | सौ. स्विटी मेंडोसा | | |

सदर स्पर्धेचा पारितोषीक वितरण समारंभ सन्माननीय श्री.सुहास सामंत माजी बेस्ट समिती सदस्य यांच्या शुभहस्ते दिनांक ०७.०३.२०२५ रोजी संपन्न झाला. सदर उद्घाटन प्रसंगी सर्वश्री.सुदास सावंत उप सरचिटणीस- क्रीड, सुर्यकांत भोपी - मा.सचिव (फुटबॉल), सुनिल शिंदे - मा.सचिव (हॉकी), शिवकुमार गोसाई – मा.सचिव (व्हॉलीबॉल), रुपेश पाडावे माजी मा. (बैठे खेळ) – पी.व्ही.सुजयकुमार माजी खेळाडू व इतर मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी खेळाडूंना मौलिक मार्गदर्शन केले व भाविष्यातील कामागिरीकरीता शुभेच्छा दिल्या.

<u>मिलीनियम योनेक्स सनराइज महाराष्ट्र मास्टर्स स्टेट सिलेक्शन बॅडमिंटन चॅम्पियनशीप २०२४-२०२५:-</u>

मिलीनियम योनेक्स सनराइज महाराष्ट्र मास्टर्स स्टेट सिलेक्शन बॅडमिंटन चॅम्पियनशिप २०२४-२५ या स्पर्धेचे आयोजन दिनांक २०.०२.२०२५ ते २३.०२.२०२५ या दरम्यान क्लब वन सी, सी.आय. चर्चगेट मुंबई येथे करण्यात आले. या स्पर्धेत सौ.सायली परब, श्री.सचिन भारती, सुदास सावंत, दिपक दमानिआ, दिनेश पांडे, गणेश शिंदे तसेच सौ. संगिता जाधव,व श्रावणी ढापरे यांनी भाग घेतला होता.

श्री.सचिन भारती ४५+ पुरुष एकेरी गटात पात्रता फेरी पार करून मुख्य फेरीच्या दुस-या फेरीत बाद झाले.श्री.सुदास सावंत व श्री.दिपक दमानिआ यांनी ५०+ पुरुष दुहेरी गटात पात्रता फेरीत तिस-या फेरी पर्यंत मजल मारली.

श्री. दिनेश पांडे यांनी ५५+ पुरुष ऐकरी गटात पात्रता फेरीच्या दुस-या फेरीपर्यंत मजल मारली. सौ. संगीता जाधव यांनी ५०+ महिला एकेरी गटात पहिल्या फेरीत पराभूत झाल्या. तसेच ५०+ महिला दुहेरी गटाच्या पहिल्या फेरीत बाद झाल्या. सौ श्रावणी ढापरे यांनी ५०+ महिला दुहेरी स्पर्धेत पहिल्या फेरीत पराभूत झाले., तसेच महिला दुहेरी या गटात पहिल्या फेरीत बाद झाल्या.

<u>३ योनेक्स सनराइज महाराष्ट्र स्टेट मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धा २०२४-२५ :-</u> योनेक्स सनराइज महाराष्ट्र स्टेट बॅडमिंटन चॅम्पिअनशीप २०२४ या स्पर्धेचे आयोजन दिनांक ०८ जानेवारी २०२४ ते १२ जानेवारी २०२५ या कलावधीत के. एम. रांगणेकर बॅडमिंटन संकुल दादोजी कोंडदेव स्टेडिअम खार्टन रोड ठाणे येथे करण्यात आले. या स्पर्धेत श्रीमती. सायली परब , श्री.सचिन भारती, श्री दिपक दमानिआ, श्री दिनेश पांडे व श्री.सुदास सावंत यांनी भाग घेतला होता.

श्री. सचिन भारती यांनी ४५+ पुरुष एकेरी स्पर्धेत उप उपांत्य फेरीपर्यंत तसेच ४५+ मिश्र दुहेरी स्पर्धेत

सौ. सायली परब यांच्यासोबत उप उपांत्य फेरीपर्यत मजल मारली.

श्री.दिपक दमानिआ यांनी ५५+ पुरुष स्पर्धेत पात्रता फेरीत तिस-या फेरीपर्यत मजल मारली.

श्री.दिनेश पांडे यांनी पुरुष एकेरी ५५ + गटाच्या स्पर्धेत तिस-या फेरीपर्यंत मजल मारली.

श्री. सुदास सावंत यांनी पुरुष एकेरी ५०+ गटाच्या स्पर्धेत दुस-या फेरीपर्यंत मजल मारली.

सौ. सायली परब यांनी महिला एकेरी ४५+ गटाच्या स्पर्धेत दुस-या फेरीपर्यंत मजल मारली.

तसेच दुहेरी ४५+ स्पर्धेत उप उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली.

## क्रिकेट विभाग



१. **‘वार्षिक आंतर आगार क्रिकेट स्पर्धा २०२४-२५’ :-**

दिनांक २८.११.२०२४, ०२.१२.२०२४व ०४.१२.२०२३ रोजी हिंदू जिमखाना मरीन ड्राइव्ह व पोलीस जिमखाना येथे वार्षिक आंतर आगार क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. दरवर्षी मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या बहुतेक स्पर्धा २०-२० मर्यादित षटकांच्या खेळविल्या जातात म्हणून वार्षिक आंतर आगार क्रिकेट स्पर्धा देखील २०-२० षटकांची खेळविली गेली. या स्पर्धेचा उद्‌घाटन सोहळा श्री. अजय मुनी प्रशिक्षक, महाराष्ट्र अंध क्रिकेट क्रीडा असोशिएशन यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.त्यावेळी श्री.मंगेश साटम - ॲपेक्सकॉन्सिल मेंबर, मुंबई क्रिकेट असोसिएशन श्री.सुदास सावंत उप सरचिटणीस – क्रीडा इतर पदाधिकारी मानद् सचिव व खेळाडू उपस्थित होते स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी श्री. जमील मुल्ला सह-आगार व्यवस्थापक - कुलाबा व श्री सुदर्शन गायकवाड वरिष्ठ आगार अधिकारी - बॅकबे आगार यांनी भेट देऊन नावलैकिकाचा मान स्विकारुन स्पर्धेतील दोन्ही संघाना शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेत एकूण ६३ उत्कृष्ठ खेळाडू निवडून त्यांचे ‘अ’ ‘ब’ ‘क’ व ‘ड’ असे ४ समतोल संघ बनविण्यात आले.गतवर्षीप्रमाणे या वर्षी सुध्दा कामगारांच्या मुलाच्या गुणांना वाव मिळण्याकरिता आंतर आगार क्रिकेट स्पर्धेत खेळण्याची संधी देण्यात आली होती. एकूण१९ मुलांनी स्पर्धेत भाग घेतला होता. अंतिम साखळी सामना ‘ब’संघ विरुध्द ‘क’ संघ दरम्यान झाला. गुणाच्या आधारे विजेता व उपविजेता संघ घोषित करण्यात आला साखळी सामन्यांच्या गुणानुसार निकाल पुढीलप्रमाणे

सामन्यांच्या गुणानुसार निकाल पुढीलप्रमाणे:-

| क्र. | संघ | निकाल |
|---|---|---|
| १. | ‘ब संघ | विजेता |
| २. | ‘क’ संघ | उपविजेता |

| क्र. | संघ | निकाल |
|---|---|---|
| १. | सर्वोत्कृष्ट फलंदाज | श्री. देवराज गायकवाड |
| २. | सर्वोत्कृष्ट गोलंदाज | श्री. महेश भोसले |

या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ दिनांक ०४ डिसेंबर २०२४ रोजी सन्माननीय श्री.दिनेश लाड(प्रशिक्षक१६वर्षाखालील,मुंबई क्रिकेट असोसिएशन) यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. या प्रसंगी श्री.प्रमोद यादव, ॲपेक्स कॉन्सिल मेंबर मुंबई क्रिकेट असोसिएशन, सरचिटणीस क्रीडा व अपेक्स कॉन्सिल मेंबर, मंगेश साटम - अपेक्स कॉन्सिल मेंबर, मुंबई क्रिकेट असोसिएशन, श्री.धनजंय पवार माजी सभापती - क्रीडा, श्री.सुदास सावंत, उपसरचिटणीस – क्रीडा, तसेच बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.या स्पर्धेत मुंबई क्रिकेट असोसिएशनचे श्री.विजय वाघमारे व श्री.सुर्या जोशी यांनी पंच म्हणून काम पाहिले.

सन २०२४-२५ चा संघ निवडण्यासाठी निवड समितीवर श्री. प्रमोद यादव, सरचिटणीस – क्रीडा व ॲपेक्स कॉन्सिल मेंबर मुंबई क्रिकेट असोसिएशन, मंगेश साटम – व ॲपेक्स कॉन्सिल मेंबर मुंबई क्रिकेट

असोसिएशन, प्रशांत खानविलकर, मानद् सचिव – हॉकी आणि अजमल बेग यांची नेमणूक करण्यात आली होती.

२०२५-२६ या वर्षाकरिता निवड करण्यात आलेला बेस्टचा क्रिकेट संघ पुढीलप्रमाणे :-

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | अ.क्र. | नाव (सर्वश्री) | अ.क्र. | नाव (सर्वश्री) |
|---|---|---|---|---|---|
| १. | विनय सोपते (कर्णधार) | २. | देवराज गायकवाड | ३. | मंदार पाटील |
| ४. | अशोक हक्के | ५. | ज्ञानेश्वर गर्जे | ६. | केतन घटावकर (उपकर्णधार) |
| ७. | महेश नाईक | ८. | संजय कदम | ९. | विजय यादव |
| १०. | सुरेश गडेकर | ११. | सर्वेश शेटये (यष्टीरक्षक) | १२. | प्रविण पेडणेकर |
| १३. | किरण खानविलकर | १४. | निलेश खरमाळे | १५. | कुणाल मिसळ |
| १६. | सुनिल राऊत | | | | |

| राखीव खेळाडू | | सपोर्ट स्टॉफ | | कामगार पाल्य | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | अ. क्र. | नाव (सर्वश्री) | अ.क्र. | नाव (सर्वश्री) |
| १. | सचिन खेडेकर | १. | गंगाराम दौंड | १. | मंदार गजमल |
| २. | मदन गणेकर | २. | जयदीप हटले | २. | श्रेयश जाधव |
| ३. | मंजुनाथ आठ्ठी | ३. | संदीप काटे | | |
| ४. | महेश भोसले | ४. | हेरंब पोतदार | | |

श्री. मंगेश साटम – मेंटॉर (सल्लागार)

निवड समिती : सर्वश्री (१) प्रशांत खानविलकर, मानद् सचिव (हॉकी), (२) प्रमोद यादव, सरचिटणीस (क्रीडा) व ॲपेक्स कॉन्सिल मेंबर मुंबई क्रिकेट असोसिएशन, (३) मंगेश साटम मानद् सचिव (क्रिकेट) ॲपेक्स कॉन्सिल मेंबर मुंबई क्रिकेट असोसिएशन, (४) अजमेल बेम माजी मानद् सचिव (क्रिकेट)

या वर्षी बेस्ट क्रिकेट संघाचे टॉईम्स शिल्ड चषक क्रिकेट स्पर्धेमध्ये पहिल्या फेरीत मुंबई क्रिकेट असोसिएशन स्टाफ क्लब संघाकडून पराभव स्वीकारावा लागला.

बेस्ट संघाने इन्सुरन्स चषक क्रिकेट स्पर्धेमध्ये पहिल्या फेरीत भविष्य निर्वाह निधी संघास, दुस-या फेरीत सेटलाईट, तिस-या फेरीत टाईम्स ऑफ इंडिया या संघाचा पराभव करुन बेस्टच्या संघाने उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली.उपांत्यपूर्व फेरीत अर्पितटाइगर संघाकडून पराभव स्वीकारावा लागला.

बेस्ट संघाने कॉर्पोरेशन चषक क्रिकेट स्पर्धेमध्ये पहिल्या फेरीत मुंबई पोर्ट ट्रस्ट, दुस-या फेरीत ओरिएंटल।, तिस-या फेरीत डेटामाटीक गोल्बल, उपांत्यपूर्व फेरीत एम.टी.एन. एल.संघाचा पराभव करून बेस्टच्या संघाने उपांत्य फेरीत धडक मारली.उपांत्य फेरीत डेटामाटीक संघाकडून ३८धावांनी पराभव स्वीकारावा लागला.

बेस्ट संघाने एम. सी. ए कॉर्पोरेट चषक किक्रटे स्पर्धेमध्ये पहिल्या फेरीत पी. डी. हिंदुजा, दुस-या फेरीत बँक ऑफ बडोडा, तिस-या फेरीत माझगाव डॉक, उपांत्यपूर्व फेरीत स्टॅण्डर्ड चार्टर्ड संघाचा पराभव करून बेस्टच्या संघाने उपांत्य फेरीत धडक मारली. उपांत्य फेरीत वेस्टर्न रेल्वे संघाचा पराभव करुन बेस्टचा संघाने

अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम फेरीत बेस्ट व मुंबई महापालिका संघ समोरा समोर होते, या अटीतटीच्या सामन्यांत बेस्ट संघाला ३ गडीराखून पराभव स्वीकारावा लागला

फुटबॉल



१ 'आंतर आगार फुटबॉल स्पर्धा २०२३-२४' :-

प्रस्तुतवर्षी आंतर आगार फुटबॉल स्पर्धा २०२४-२५ दिनांक ०५ फेब्रुवारी २०२५ ते ०७ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत  कर्नाटक स्पोट्स असोशिएशप मैदान, चर्च गेट येथे आयोजित करण्यात आली होती.

दिनांक ०५फेब्रुवारी २०२५रोजी स्पर्धेचा उद्‌घाटन साहोळा श्री.विशाल नामदेव पिसे साहेब, डेपा अधिकारी, मालवणी आगार यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.सदर प्रसंगी श्री.प्रविण शेट्‌टी साहेब, वरिष्ठ वाहतूक अधिकारी, श्री. अशोक सांगळे, मनोरंजन पर्यवेक्षक तसेच बेस्ट कला व क्रीडा मंडळाचे मानद् सचिव या कार्यक्रमास उपस्थित होते. यावर्षी देखील कामगारांच्या मुलांना आंतर आगार फुटबॉल स्पर्धेत खेळण्याची संधी देण्यात आली. कामगारांच्या मुलांनी स्पर्धेत उत्तम प्रतिसाद दिला.संघाची विभागणी खालीलप्रमाणे ४ गटात करण्यात आली. सामने साखळी पध्दतीने खेळविले गेले.

१. दादर संघ - दादर कार्यशाळा, वरळी, आणिक, प्रतिक्षा नगर, देवनार व शिवाजीनगर
२. कुलाबा संघ - कुलाबा, बँकबे, मध्य मुंबई, कसारा, पाठकवाडी, मागाठाणे, पोयसर व गोराई
३. वांद्रे संघ - वांद्रे, मरोळ, मजास, सांताक्रुझ, गोरेगांव, दिडोंशी, ओशिवरा, मालवणी व मालाड
४. वडाळा संघ - वडाळा, मुलुंड, घाटकोपर, कुर्ला, विक्रोळी, धारावी, काळाकिल्ला

सदर पारितोषित वितरण समारंभ दिनांक ०७ फेब्रुवारी २०२५रोजी श्री. विनायक शिंदे, उप.मुख्य सुरक्षा अधिकारी व श्री.सुदास सावंत, बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाचे उपसरचिटणीस –क्रीडा यांच्या शुभहस्ते विजेता वडाळा आगार संघ व उपविजेता बांद्रा आगार संघ यांना प्रदान करण्यात आले.सदर पारितोषिक वितरण समारंभास श्री. प्रविण शेट्‌टी साहेब वरिष्ठ वाहतूक अधिकारी, श्री.अशोक सांगळे, मनोरंजन पर्यवेक्षक तसेच बेस्ट कला आणि क्रीडा विभागाचे मानद सचिव उपस्थित होते.

शेट्‌टी साहेब, वरिष्ठ अधिकारी, श्री.सांगळे, मनोरंजन पर्यवेक्षक तसेच बेस्ट कला आणि क्रीडा विभागाचे मानद् सचिव उपस्थित होते.

१. कै. भालचंद्र मोरे चषक विजेता संघ – वडाळा आगार
२. कै. युसुफ शेख चषक उपविजेता संघ - बांद्रा आगार
३. कै.सुरेंद्र सावंत चषक आंतरआगार ¯ श्री. प्रविण शेट्‌टी साहेब स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडू
४. कै.नतीन भोसले चषक एमएफए लिग - श्री. दिगंबर भोसले स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडू
५. कामगारांच्या मुलांमधील आंतरआगार - कु. विजय दास स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडू
६. मुंबई लिग स्पर्धेत कामगारांच्या मुलांमधील -कु दाईश चौधरी स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडू

सन २०२३-२४ करिता बेस्ट फुटबॉल संघ खालीलप्रमाणे निवडण्यात आला.

| क्र. | नाव (सर्वश्री) | क्र. | नाव (सर्वश्री) | क्र. | नाव (सर्वश्री) |
|---|---|---|---|---|---|
| १. | सूर्यकांत भोपी (मानद् सचिव) | २. | सागर मेस्त्री (गोलरक्षक) | ३. | सचिन घरटे (गोलरक्षक) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४. | प्रविण शेट्टी | ५. | उदय पेडणेकर | ६. | बिजी कुंजनचन |
| ७. | अभय घरत | ८. | प्रफुल्ल भोईर | ९. | दिंगबर भोसले |
| १०. | सर्जन भोईर | ११. | पृथ्वीराज भिक्रू | १२. | सौरभ लोखंडे |
| १३. | गणेश केदार | १४. | सचिन पाटणकर | १५. | तुषार कर्डक |
| १६. | प्रकाश पाटील | १७. | मयुरेश शेटये | १८. | हर्षल पाटकर |
| १९. | योगेश सोलंकी | २०. | योगेश शिरसाठ | | |

सन २०२५-२६ करिता बेस्ट फुटबॉल संघात कामगारांच्या मुलांचा देखील समावेश व्हावा यासाठी खालील कामगारांच्या मुलांची निवड करण्यात केलेली आहे.

| अ.क्र . | नाव (सर्वश्री) | अ क्र. | नाव (सर्वश्री) | अ क्र. | नाव (सर्वश्री) |
|---|---|---|---|---|---|
| १ | अनिकेत महामुनी | ३. | विजयदास शिवदासन | ७ | क्षितिज पेडणेकर |

सन २०२५-२६ करिता बेस्ट फुटबॉल संघाचे प्रशिक्षक म्हणून श्री.चौकेंद्र नार्वेकर यांची निवड करण्यात आली. तसेच संघटक व किटमन म्हणून सर्वश्री सुरेश गोरिवले व विलास पाटील यांची निवड करण्यात आली. तसेच गेल्यावर्षी लिग सामन्यामध्ये खेळलेल्या कामगारांच्या मुलांना सन्मानचिन्ह व सर्टिफिकेट देऊन त्यांचा सत्कार केला.

बेस्ट फुटबॉल संघाचे प्रतिनिधित्व केलेले खेळाडू श्री. प्रविण शेट्टी व गेली २४ वर्षे बेस्ट फुटबॉल संघाचे संघटक श्री. सुरेश गोरिवले यांनी फुटबॉल संघासाठी योगदान दिल्याबद्दल शाल व मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले.

सन २०२३-२४ मध्ये बेस्ट संघाने मुंबई जिल्हा फुटबॉल असोसिएशन आयोजित करीत असलेल्या लिग स्पर्धेत कॉर्पोरेट क्षेत्रातील पहिला विभागात प्रतिनिधित्व केले. तसेच गोदरेज अॅड बॉईज, आय. आय. टी. मुंबई, कुलाबा मच्छिमार फुटबॉल संघ, नेव्हल डॉक, सचिवालय, ओ. पी. फुटबॉल क्लब या मान्यवर संघाबरोबर मैत्रिपूर्वक सराव सामने खेळलो.

## हॉकी



१.‘आंतर आगार हॉकी स्पर्धा २०२४-२५’ :-

बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाच्या हॉकी विभागाच्या आंतर आगार हॉकी स्पर्धेचा उद्घाटन सोहळा दिनांक २६.११.२०२४रोजी महिंद्रा स्टेडियम, मुंबई हॉकी असोसिएशन चर्चगेट येथे संपन्न झाला. स्पर्धेचे उद्घाटन श्री. राजाराम करे उपमुख्य अभियंता परिवहन अभियांत्रिकी विभाग यांच्या शुभहस्ते करण्यात आला. उद्घाटनास विविध विभागांचे मानद् सचिव उपस्थित होते.

साखळी पद्धतीने खेळवल्या जाणा-या स्पर्धेत बेस्ट संघातील खेळाडू व नवोदित खेळाडू मिळून तीन समान संघ करण्यात आले.

(१) वडाळा संघ (२) कुलाबा संघ (३) वांद्रे संघ

दिनांक २७.११.२०२४ रोजी गुण सरासरीत अव्वल दोन संघात खेळवल्या गेलेल्या अंतिम सामन्यात वडाळा संघाने कुलाबा संघाचा१: ० अशा गोल फरकाने सामना जिंकून प्रतिष्ठेचा को.रा.आ. शेट्टी चषक

पटकावला.पारितोषिक वितरण समारंभास प्रमुख पाहुणे श्री. बिलाल शेख, मंडळाचे उपाध्यक्ष - सहाय्यक महाव्यवस्थापक (विदयुत  पुरवठा) व श्री. विनायक शिंदे उप मुख्य सुरक्षा अधिकारी यांच्या शुभहस्ते पार पडला.दोन्ही प्रमुख पाहुण्यांनी तसेच सरचिटणीस क्रीडा श्री.प्रमोद यादव यांनी खेळाडूना मार्गदर्शन केले. उपसरचिटणीस क्रीड श्री.सुदास सावंत, मनोरंजन पर्यवेक्षक श्री.अशोक सांगळे व विविध क्रीडा विभागाचे मानद् सचिव उपस्थित होते.सर्व मान्यवरांचे मानद् सचिव हॉकी यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले तसेच आभार प्रदर्शनाच्या भाषणात मागील ३ वर्षाचा लेखाजोखा मांडून, सर्व खेळाडू, प्रशिक्षक, कीट-कॅरियर,संघटक व बेस्ट कला  आणि क्रीडा  मंडळाचे सर्व पदाधिकारी यांचे आभार मानले.

सदर स्पर्धेचे पंच सर्वश्री.सौरव धाडवे, प्रथमेश कान्हेरे व.ओंकार जाधव यांनी पंचाची कामगिरी उत्कृष्ठरित्या पार पडली. निवड समिती सदस्य  म्हणून बेस्टचे माजी  हॉकी खेळाडू सर्वश्री. ब्रुनो डायस, अनिल फडके व विलास तळेकर यांनी काम पाहिले.


निवड समितीने २०२५-२६सालाकरिता बेस्टचा  सर्वोत्तम संघ निवडला  तसेच स्पर्धेतील  सर्वोत्तम खेळाडू म्हणून  श्री.रमेश कुरी यांची निवड केली. या स्पर्धेचे वैशिष्टय असे की,कामगाराच्या एका पाल्यांची निवड बेस्ट हॉकी संघात करण्यात आलेली आहे.

२०२४-२५ या वर्षाकरिता निवड करण्यात आलेला बेस्टचा हॉकी संघ पुढीलप्रमाणे :-

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | अ.क्र. | नाव (सर्वश्री) | अ.क्र. | नाव (सर्वश्री) |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्रशांत खानविलकर | २. | राजेश गावडे | ३. | एकनाथ सनस |
| ४. | प्रविण शेट्टी | ५. | शैलेंद्र सोनटक्के | ६. | विन्सेंट फुटार्डो |
| ७. | सुर्यकांत भोपी | ८. | रमेश कुरी | ९. | इरफान सय्यद |
| १०. | बिसमिल्लाह  तडवी | ११. | नितिन देशमाने | १२. | प्रशांत प्रभुळकर |
| १३. | प्रकाश धस | १४. | राजूभाई पारधी | १५. | हर्षल पाटकर |
| १६. | निलेश घोडे | १७. | योगेश शिरसाट | १८. | सौरभ लोखंडे |
| १९. | घनश्याम राजगे | २०. | सचिन नाईक | २१. | विजय बैले |
| २२. | देवेंद्र कांबळे | २३. | कुणाल मोहिते (संघटक किटमॅन) | २४. | सुरेश महेश्वरम (संघटक किटमॅन ) |
| १ | कामगार पाल्य यश देशमाने | | | | |

सन २०२५-२६ करिता बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाच्या हॉकी संघाचे प्रशिक्षक व मार्गदर्शक (MENTOR) हणून श्री. उदय पेडणेकर यांची निवड करण्यात आली, तसेच कामगार पाल्य कुमार यश देशमाने याची खेळाडू निवड करण्यात आली आहे.

बैठेखेळ



(कॅरम व बुध्दीबळ)



१. वार्षिक  कॅरम व बुध्दीबळ स्पर्धा २०२४-२०२५:-

वार्षिक कॅरम व बुध्दीबळ स्पर्धा दिनांक १०.०२.२०२५ ते १५.०२.२०२५ या कालावधीत वडाळा आगार क्रीडा कक्ष व दादर कार्यशाळा क्रीडा कक्ष या ठिकाणी खेळविण्यात आल्या. या स्पर्धेतील कॅरम विभागात एकूण २९५ खेळाडूंनी व बुध्दीबळ विभागात एकूण ३० खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ सोमवार दिनांक १०.०२.२०२५रोजी सकाळी ९.३० वाजता उद्घाटन सन्माननीय श्रीमती. माधवी जुवेकर (सिने नाटय अभिनेत्री), श्री. विजय सूर्यवंशी (सिने नाटय अभिनेता-नाटय परिषद कार्यवाह) व प्रविण नाईक (सिने नाटय अभिनेता यांच्य शुभहस्ते संपन्न झाला.या प्रसंगी सर्वश्री. प्रमोद यादव(सरचिटणीस-क्रीडा), सुदास सवांत(उपसरचिटणीस –क्रीडा) तसेच विविध कला व क्रीडा विभागातील मानद् सचिव अधिकारी व कर्मचारी वर्ग, आजी-माजी खेळाडू बंधू –भगिनी व इतर मान्यवर मंडळी उपस्थित होते. सदर प्रसंगी बेस्टेचे सेवानिवृत्त कर्मचारी खेळाडू श्री.सुधिर कांबळे, श्री.बाळु बर्वे व अन्य यांचा सत्कार करण्यात आला.

सदर कॅरम स्पर्धा दररोज सकाळी ९.०० वा.पासून सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सोमवार पासून खेळविण्यात आली. या कॅरम स्पर्धेसाठी सर्वश्री. हितेन पटेल,यांनी सहाय्यक पंच म्हणून काम पाहिले व बुध्दीबळ स्पर्धेसाठी श्री.गजानन सोनी व श्री.संजय बर्वे यांनी प्रमुख पंच म्हणून काम पाहिले.

या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवार दिनांक ०१५.०२.२०२५ सायंकाळी ४.३० वाजता प्रमुख पाहुणे सन्माननीय श्री. थोरात साहेब श्री. चौधरी साहेब (नागसेन एटोबे (राष्ट्रीय विजेता), श्री. संदीप देवरुखकर (राष्ट्रीय विजेता) यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. या प्रसंगी प्रमोद यादव (सरचिटणीस – क्रीडा) श्री.सुदास सावंत (उप सरचिटणीस –क्रीडा ) तसेच विविध कला व क्रीडा विभागातील पदाधिकारी. मानद सचिव, अधिकारी व कर्मचारी वर्ग क्रीडारसिक उपस्थित होते.

या दोन्ही सभारंभाचे सूत्र संचालन सर्वश्री सुरेश साळुंखे यांनी केले. सर्व पाहुण्यांचे तसेच कला व क्रीडा विभाागातील सर्व पदाधिका-यांचे श्री. निलेश परब, यांनी पुष्प गुच्छ देवून स्वागत केले व सदर कार्यक्रम संपन्न झाल्यानर सर्वांचे अभार मानले.

२०२५-२६ या वर्षाकरिता निवड करण्यात आलेला बेस्टचा कॅरम व बुध्दीबळ संघ पुढीलप्रमाणे :-

कॅरम पुरूष संघ (सर्वश्री)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | निखिल घोलप | २ | सुधीर पवार | ३ | संदीप जोगळे |
| ४ | राजेश मेहता | ५ | हेमंत मोरे | ६ | मंगेश भालेराव |
| ७ | सुधीर जाधव | ८ | मनोज पाटील | ९ | रमेश कुनचेकर |
| १० | निखिल कांबळे | ११ | राजेश घोलप | १२ | भाजीराव मसले |
| १३ | राजेंद्र सुर्वे | १४ | संतोष देवरूसकर | १५ | विनायक शिरीमळ |
| १६ | विनोद साळवे | | | | |

कॅरम महिला खेळाडू

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती प्रज्ञा पटेल | २ | श्रीमती रुपाली रोकडे |

प्रौढ खेळाडू

| | | | |
|---|---|---|---|
| १ | धर्मवीर जाधव | २ | रमेश अट्टा |

बुध्दीबळ खेळाडू

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | राजेंद्र कळवे | २ | रूपेश पाडावे | ३ | संजय दळवी |
| ४ | सत्यवान तांबे | ५ | शंकर जलदवार | | |

२.ऑल इंडिया ओपन शान्तिकुमारजी फिरोदिया क्लासिकॅल फिडे चेस अंजिक्य पद स्पर्धा : - सदर स्पर्धा अहमदनगर येथे दिनांक ०६.११.२०२४ ते १०.११.२०२४ रोजी या दरम्यान पार पडली. या स्पर्धेत ३५० जागतिक दर्जाचे खेळाडूचा सहभाग होता. या स्पर्धेत बेस्ट उपक्रमातर्फे श्री. रूपेश पाडावे, श्री.सेबेस्तीन मेनेझिस व श्री. सत्यवान तांबे ४.५ गुण मिळवून घवघवीत यश प्राप्त केले आहे.

३.ऑल इंडिया फिडे चेस अंजिक्य पद स्पर्धा :- सदर स्पर्धा २०२४-२५ गोरेगाव, मुंबई येथे दिनांक २६.१२.२०२४ ते २८.१२.२०२४ दरम्यान पार पडली. या स्पर्धेत ३२० खेळाडूचा सहभाग होता. बेस्ट उपक्रमातर्फे श्री.रूपेश पाडावे ,व श्री.सत्यवान तांबे यांनी सहभाग घेतला. श्री.रुपेश पाडावे -५.५ गुण श्री. सत्यवान तांबे ४.५ गुण मिळवून घवघवीत यश प्राप्त केले आहे.

## कबड्डी विभाग



१. वार्षिक आंतर आगार कबड्डी स्पर्धा २०२४-२५' :-

दिनांक २७जानेवारी २०२५ ते ३१जानेवारी २०२५कालावधी मध्ये बेस्ट कामगार वसाहत परेल ह्या मैदानावर झाली. ह्या स्पर्धेमध्य २० संघानी भाग घेतला होता.स्पर्धेचे उद्घाटन माननीय श्री.सुरेश शि. आवटे साहेब तसेच माननीय श्री.गणेश म.गिरी साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

उद्घाटन सामना दादर कार्यशाळा (ब) व घाटकोपर आगार ह्या दोन संघांमध्ये २७/०१/२०२५ ह्या दिवशी खेळविण्यात आला. अंतिम सामना मध्यमुंबई आगार व धारावी आगार ह्या दोन संघांमध्ये दिनांक ३१/०१/२०२५ ह्या दिवशी झाला.दोन्ही संघामध्ये जिंकण्यासाठी चुरशी लढत झाली. शेवटी २७:३३.अशा गुणांनी धारावी आगार संघ विजयी झाला. मध्यमुंबई आगारातील मगेश भिल्लारे यांनी चांगली खेळी खेळली शेवटी धारावी आगारातील भुषण थोरात यांच्या पुढे त्यांचे काही चालले नाही.अखेर धारावी आगार हा संघ अंतिम विजयी झाला.

स्पर्धेचे बक्षिस सभारंभ श्री.द.ग.पाटील साहेब, श्री..योगेश ना मयेकर,श्री.सचिन शिंदे, श्री.संतोष खोत या प्रमुख पाहुण्याच्या हस्ते पार पाडण्यात आला.

दिनांक ३१/१/२०२५ रोजी पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माननिय श्री.अनिल कोकीळ साहेब, मा. नगरसेवक, बेस्ट समिती अध्यक्ष तसेच बेस्ट क्रेडिट सोसायटीचे सरचिटणीस श्री.उमेश सारंग हयांच्या शुभहस्ते विजेता संघ धारावी आगार ह्या संघास कै.इंदिराबाई शेट्टे फिरता चषक सोबत रोख पारितोषिक व प्रशस्तीपत्रके देण्यात आली. तिस-या क्रमांकासाठी बॅकबे आगार 'फिरता चषक तर या स्पर्धेतील शिस्त बंध्द संघ म्हणून बांद्रा आगार संघास कै.गणपतराव विश्वासराव फिरता चषक पारितोषिक देण्यात आले.

बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाच्या विभागातर्फे कै. मधुसूदन पाटील स्मरणार्थ ठेवण्यात आलेला फिरता चषक श्री.मंगेश भिलारे मध्यमुंबई आगार यांना माननिय श्री.उमेश सारंग सराचिटणीस (बेस्ट क्रेडिट सोयायटी )यांच्या शुभहस्ते देण्यात आला.

पंच सर्वश्री.दिनेश कदम (राष्ट^ीय पंच) (बेस्ट उपक्रम) जितेंद्र दळवी, किरण नाईक, अमेय म्हादये,अमित ठाकूर मनोज वरळीकर, यांनी पंच म्हणून काम पाहिले. निवड समितीत पुढील सदस्य होते. सर्वश्री (१) अजित जगदाळे (२)नरेश चाळके(३) नरेद्र तावडे, (४) सुरेश जाधव, (५) सुहास तावडे.

| अ.क्र. | आगार | पारितोषिक | चषक |
|---|---|---|---|
| १. | धारावी आगार | विजेता | ‘कै. इंदिराबाई शेटये फिरता चषक |
| २. | मध्यमुंबई आगार | उपविजेता | शरद आचार्य चषक |
| ३. | बॅकबे आगार | तिसरा क्रमांक | बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाचा फिरता चषक |
| ४. | बांद्रा आगार | ‘शिस्तबध्द’ संघ | कै. गणपतराव विश्वासराव फिरता चषक |

२०२५–२६ या वर्षाकरिता निवड करयात आलेला बेस्टचा कबड्डी संघ पुढीलप्रमाणे :-

| अ.क्र | सर्वश्री. | अ.क्र | सर्वश्री. | अ.क्र | सर्वश्री. |
|---|---|---|---|---|---|
| १ | जितेंद्र दळवी | २ | अमेय म्हादये | ३ | किरण नाईक |
| ४ | प्रितेश पाटील | ५ | मनोज वरळीकर | ६ | योगेश सुर्वे |
| ७ | सुरेश पाटील | ८ | राहूल परब | ९ | राजेश बेर्डे |
| १० | आशिष कोलते | ११ | विशाल कुणके | १२ | दिपक पाटील |
| १३ | रत्नाकर पाटील | १४ | मंगेश सालपेकर | १५ | मंगेश भिल्लारे |
| १६ | परेश चव्हाण | कर्मचारी पाल्य कुमार रितिक सतीश देवकुळे | | | |

२.शिवनेरी सेवा मंडळ कबड्डी संघ : दादर आयोजित राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा २०२४ दिनांक ०३.१०.२०२४ ते १३.१०.२०२४ या कलावधीत खेळवण्यात आली. बेस्टच्या कबड्डी संघास प्रथमच विशेष श्रेणी गटात भाग देण्यात आला. या स्पर्धेत प्रत्येक संघाचे ३-३ चे गट करून साखळी पद्धतीने व नंतर बाद पद्धतीने सामने खेळवण्यात आले.

साखळी स्पर्धेतील पहिला सामना बेस्ट कबड्डी संघ विरूध्द युनियन बॅक असा झाला. या सामन्यात (३२४०) असा ८गुणांनी युनियन बँकेकडून बेस्ट संघाचा पराभव झाला. या सामन्यात सर्वश्री दिपक पाटील, मंगेश भिल्लारे,योगेश सुर्वे यांनी दमदार खेळ केला.

साखळी स्पर्धेतील दुसरा सामना बेस्ट कबड्डी संघ विरूद्ध सिद्धी कन्स्ट्रक्शन असा झाला. या सामन्यात बेस्ट कबड्डी संघाने सर्वोत्त कामगिरी करत (४१-३६) सिद्धी कन्स्ट्रक्शन संघाचा ५गुणांनी पराभव केला. प्रथमच या सामन्यात बेस्ट कामगारांच्या मुलांना बेस्टच्या कबड्डी संघातून खेळवण्यात आले.

साखळी स्पर्धेतील गटात बेस्ट कबड्डी संघ उपविजयी तर युनियन बँकेचा संघ विजयी झाला. पुढे बाद फेरीतील सामन्यात बेस्ट कबड्डी संघाचा सामना युवा फलटण या संघाशी झाला. या अटीतटीच्या सामन्यात बेस्ट कबड्डी संघाचा (२८-३६) असा ८गुणांनी पराभव झाला. सदर सामन्यात बेस्ट कबड्डी संघाच्या सर्व खेळाडूंनी जिंकण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

३.<u>मुंबई शहर कबड्डी असोसिएशन जिल्हा अंजिक्यपद कबड्डी स्पर्धा २०२४</u> – दिनांक ०१.०१.२०२५ ते ०३.०१.२०२५या कालावधीत खेळवण्यात आली. ‘स्व. दुलाजी राणे स्मृती चषक या नावाने स्पर्धा खेळवण्यात आली.

असून सदर स्पर्धा ही बाद फेरी पध्दतीने खेळवण्यात आली. सदर पहिली फेरी ही सद्धा मुंबई नगरीत नावजलेली होत असलेली अग्निशमन सेवा कला व क्रिडा मंच यासंघाबाबर झाला. या दोन्ही बलाढय संघामध्ये अतिशय चुरशीचा सामना झाला.


या सामन्यात दोन्ही संघाचे खेळाडू चांगल्या प्रकारे आपल्या संघाला जिंकण्याच्या ताकतीमध्ये खेळत होता. शेवटी या हार आणि जीत ही असतेच या अटीतटीच्या सामन्यात बेस्ट कबड्डी संघाचा (३८-४२) अशा ५ गुणांनी पराभव झाला. सदर सामन्यात बेस्ट कबड्डी संघाचा सर्व खेळाडूंनी जिंकण्यासाठी आपली पुरेपूर महीनत पणाला लावली होती. व प्रयत्न हि खपूप केला होता.

४.<u>व्यावसायिक पुरुष व महिला कबड्डी अजिक्यपद स्पर्धा २०२४-२५ - श्री. बसावेश्वर देवस्थान जत्रा महोत्सव कमिटी</u> <u>खिळेगाव जिल्हा बेलगावी कर्नाटक -</u> दिनांकः११.०४.२०२४ ह्या दिवशी संघ्याकाळच्या सत्रात सामना खेळविण्यात आला. सदर मॅच बी.ई.एस.टी विरूध्द बी.एस.ए.बेलगुन्डी कोल्हापूर याच्या विरूध्द खेळविण्यात आला. हया मॅच स्कोअर २७ वि २५ असा झाला असून बी.ई.एस. टी हा संघ २ गुणांनी पराभूत झाला. पंचाच्या चुकीच्या निर्णयाने बळी पडलो. हय मॅचमध्ये रत्नाकर पाटील, आशिष कोलते, राजेश बेर्डे, मंगेश भिल्लारे यांनी उत्कृष्ट खेळ करून सामना शेवटच्या क्षणापर्यंत रंगतदार झाला.

५. <u>ऑल इंडिया महिला व पुरुष कबड्डी स्पर्धा -</u> तामिळनाडू मुख्यमंत्री थलापे एम. के स्टेलीन यांच्या ७२ व्या वाढदिवसा निमित्त ऑल इंडिया महिला व पुरुष कबड्डी टुर्नामेंन्टस ( Affiliated to AKFI and Tamilnadu Amateur Kabaddi Association) मान्यतेने मनीपाई तिरूचि जिल्हा तामिळनाडू येथे कबड्डी सामने दिनांक २४,२५,२६ आणि २७/०४/२०२५ खेळविण्यात आले. ही स्पर्धा साखळी पद्वतीने खेळविण्यात आली. या आपल्या साखळी पद्धधित नागपूर रेल्वे आणि हरियाणा ॲकडमी या दोन बलाढय संघाचा समावेश होता.सुरूवातीला पहिला सामना हा नागपूर रेल्वे संघ विरूध्द बी.ई एस टी यात दिनांक २४/०४/२०२५ रोजी संघ्याकाळच्या सत्रात झाला. हा आमचा सामना ‘फ’गटातील पहिला साखळी सामना होता.सदर सामन्यामध्ये बी.एस. टी. संघाचा पाच गुणांनी पराभव झाला, यात नागपूर रेल्वे संघाचे २४ गुण झाले व बी. ई.एस. टी संघाचे १९ गुण झाले. या सामन्यात आपल्या कामगारांचा मुलगा कुमार ऋतिक देवखुळे व त्याच्या साथीला राहुल परब आणि रत्नाकर पाटील यांनी चांगला खेळ केला यात बी.ई. एस. टी. संघाचा पाच गुणांनी पराभव झाला.

दुसरा साखळी गटातील सामना हा हरियाणा ॲक्रडमी विरूध्द बी.ई.एस. टी. यांत दिनांक २५/०४/२०२५ रोजी संघ्याकाळच्या सत्रात झाला. या सामन्यात हरियाणा ॲकडमीला ३८गुण प्राप्त झाले, व बी.ई.एस.टी चे २३ गुण झाले. सदर सामन्यात बी.ई.एस.टी. संघाचा १३गुणांनी पराभव झाला. या मध्ये राहुल परब आणि रत्नाकर पाटील यांच्या समवेत ऋतिक देवखुळे यांनी चांगला खेळ खेळला. त्याला दोन्हांनी साथ दिली.

## टेबल टेनिस



<u>वार्षिक अंतर्गत टेबल टेनिस स्पर्धा – २०२४- २५ :-</u> टेबल टेनिस विभागातर्फे वार्षिक अंतर्गत टेबल टेनिस स्पर्धा सोमवार दिनांक ०९.१२.२०२४ ते शुक्रवार दिनांक दिनांक १३.१२ २०२४ या कालावधीत बृहन्मुंबई महानगर पालिका क्रीडा कक्ष सी. एस. टी. येथे आयोजित केली होती. सदर स्पर्धा पुरुष एकेरी, महिला एकेरी प्रौढ एकेरी, पुरुष दुहेरी, महिला दुहेरी, मिश्रा दुहेरी आणि विभागीय दुहेरी अशा एकूण सात प्रकारांमध्ये आयोजित केली होती.

स्पर्धेचे उद्घाटन सोहळा सोमवार, दिनांक ०९.१२.२०२४ रोजी माननीय श्री. उल्हास बने (मुख्य लेखापाल) बेस्ट यांच्या शुभहस्ते संपन्न झाला, या प्रसंगी मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

स्पर्धेचे अंतिम सामने व पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवार दिनांक १३.१२.२०२४ रोजी संपन्न झाला. माननीय श्री. सुनील गोडसे (विशेष कार्य- अधिकारी ) बृहन्मुंबई महानगर पालिका व माननिय श्री. पराग नाईक (माजी खेळाडू बेस्ट टेबल टेनिस संघ) यांच्या शुभहस्ते विजयी स्पर्धकांना पारितोषिक प्रदान करण्यात आली.

<u>स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे :-</u>

१. <u>पुरुष एकेरी -</u>
- १. विजेता : श्री. नितीन वालावलकर
- २. उपविजेता : श्री. संदीप कंक
- ३. तृतिय विजेता : श्री. नंदकुमार पारकर
- ४. चतुर्थ विजेता : श्री. निलेश जानवलेकर्द्ध

२. <u>महिला एकेरी -</u>
- १. विजेती : श्रीमती. श्रावणी ढापरे
- २. उपविजेती : श्रीमती. प्रणिता रावराणे
- ३. तृतीय विजेती : श्रीमती. नितू देवधर
- ४. चतुर्थ विजेती : श्रीमती. लता धूरी

३. <u>प्रौढ एकेरी</u>
- १ विजेता : श्री स्टॅनी ॲन्थनी
- २. उपविजेता : श्री. प्रशांत पिळणकर

४. पुरूष दुहेरी
- १. विजेता : श्री. नितीन वालावलकर व श्री स्टॅनी ॲन्थॉनी
- २. उपविजेता : श्री. संदीप कंक व श्री. प्रशांत पिळणकर
- ३. तृतीय विजेती : श्री. स्वप्नील कांबळे व श्री. उल्हास बने

४. चतुर्थ विजेती : श्री. संदेश वाघमारे व श्री. शैलेश जावळे

५. <u>महिला दुहेरी</u>
- १. विजेती : श्रीमती लता धूरी व नियती नेवलकर
- २. उपविजेती : श्रीमती नितू देवधर व गीता भिकाले

६. विभागीय दुहेरी

१. विजेता : श्री. उल्हास बने व श्री स्वप्नील कांबळे
२. उपविजेता : श्री. नितीन वालावलकर व श्री. स्टॅनी ॲन्थॉनी
३. तृतीय विजेती : श्री. सुमंत तोरसकर व श्री. नंदकुमार पारकर
४ चतुर्थ विजेती : श्री. संदीप कंक व श्री. विकास नागपुरे

७. मिश्र दुहेरी

१. विजेती : श्री.नितीन वालावलकर व श्रीमती. गीता भिकाले
२. उपविजेती : श्री. विकास नागपुरे व श्रीमती. लता धुरी

या स्पर्धेत प्रमुख पंच म्हणून श्री.संदीप कंक यांनी तर श्री.उल्हास कोणकर यांनी सहाय्यक पंच म्हणून काम पाहिले.

२०२४-२५ या वर्षाकरिता निवड करण्यात आलेला बेस्टचा टेबल टेनिस संघ पुढीलप्रमाणे:-

| अ. क्र. | नाव (सर्वश्री) | अ. क्र. | नाव (सर्वश्री) | अ. क्र. | नाव (सर्वश्री) |
|---|---|---|---|---|---|
| १. | नितिन वालावलकर | २. | संदीप कंक | ३. | नंदकुमार पारकर |
| ४. | निलेश जानवलेकर | ५. | जितेंद्र पवार | ६. | निलेश भोईर |
| ७. | उल्हास कोणकर | ८. | सुजित राणे | ९. | विभेष देसाई |
| १०. | विनोद मगर | | | | |

| राखीव खेळाडू (पुरुष) | | महिला खेळाडू (सर्व श्रीमती) | | राखीव खेळाडू (महिला) | |
|---|---|---|---|---|---|
| १. | सुमंत तोरसकर | १. | श्रावणी ढापरे | १. | गीता भिकाले |
| २. | प्रशांत पिळणकर | २. | प्रणिता रावराणे | | |
| | | ३. | नितू देवधर | | |
| | | ४. | लता धूरी | | |

या स्पर्धेतील निवड समिती :- श्री. नितीन वालावलकर, श्रीमती श्रावणी ढापरे व श्री. सुजित राणे

३ MCDTTA आंतर कार्यालयीन टेबल-टेनिस लिग स्पर्धा २०२४-२५:- NSCI वरळी येथे दिनांक २७.०५.२०२४ ते २९.०६.२०२४ घेण्यात आली सदर स्पर्धेत बेस्टच्या एकूण ३ संघाने भाग घेतला होता.

पुरूष संघ ऐ,.बी, सी पुरुष संघ 'ए' व पुरूष संघ 'बी' या दोन्ही संघाला सुर्वण पदक प्राप्त झाले.

पुरुष 'ए' संघातील खेळाडू खालील प्रमाणे. :-

१) श्री. नितिन वालावलकर (कर्णधार)
२) श्री. नितेश नायक
३) श्री. निलेश जानवलेकर
४) श्री. स्टॅनी ॲन्थॉनी

पुरुष 'बी' संघातील खेळाडू खालील प्रमाणे.

१) श्री. नंदकुमार पारकर (कर्णधार)
२) श्री संदीप कंक
३) श्री. जितेंद्र पवार
४) श्री. सुमंत तोरसकर

सदर स्पर्धेत पुरुष संघ 'ए' यांनी Div. II मध्ये मुंबई पोर्ट ट्रस्ट 'ए' या संघाचा पराभव करुन सुवर्ण पदक प्राप्त केले. तर पुरुष संघ 'बी' यांनी Div III मध्ये आर. बी. आय 'सी' या संघाचा पराभव करून सुवर्ण पदक प्राप्त केले.

४. <u>३० th नॅशनल मास्टर टेबल- टेनिस चॅपियन स्पर्धा २०२४-२५स्पर्धा -</u>

सदर स्पर्धा सरूर नगर इंडोर स्टेडियम ,डॉक्टर कॉलनी, एल.बी. नगर रंगारेड्डी डिस्ट्रीक कोर्ट, हैदराबाद ५०००७४, तेलंगणा येथे दिनांक ०३.०४.२०२४ ते ०८.०४.२०२४ या कालावधीत पार पडल्या

सदर स्पर्धेत संपुर्ण भारतातून एकूण ३१ राज्यांचा ६६ महिलांचा सहभाग होता.सदर स्पर्धेत बेस्ट संघाच्या श्रीमती. श्रावणी ढापरे यांचा समावेश होता. एकूण ६६ महिलांचा समावेश असणा-या या स्पर्धेत श्रीमती. श्रावणी ढापरे या मास्टर नॅशनल २०२४-२५ सदर स्पर्धेतील श्रीमती श्रावणी यांची कामगिरी खालिल प्रमाणे :-

१) महिला - एकेरी – उपांत्य फेरीत प्रवेश

२) महिला – दुहेरी – उपांत्य फेरीत प्रवेश

३) मिश्र - दुहेरी - कास्य पदक

५. <u>१ली महाराष्ट्र राज्यस्तरीय प्रौढ टेबल टेनिस स्पर्धा -</u> पलावा सिटी, डोंबिवली, येथे दिनांक १३.०६.२०२४ ते २२.०६.२०२४दरम्यान खेळविण्यात आली होती. सदर स्पर्धेत बेस्ट तर्फे श्री.नितीन वालावलकर सहभागी झाले होते. ह्या स्पर्धेत नितिन वालावलकर हे राऊंड १६साठी क्वालिफाय झाले.त्यांनी दुस-या फेरीत ठाण्याच्या श्री अनुप केतकरांचा ३-० असा पराभव केला. तिस-या फेरीत मुंबईच श्री.शरद ग्रोव्हर यांच्याकडून ३-१ अशी मात मिळाली. पण ग्रुपमध्ये दुस-या नंबरवर असल्यामुळे श्री.नितीन वालावलकर हे राऊंड ३२ क्वालिफाय झाले. राऊंड ३२ मध्ये त्यांनी श्री. शेखर कोळी यांच्यावर ३-० अशी मात केली. व ते राऊंड १६साठी क्वालिफाय झाले.राऊंड १६मध्ये नितिन वालावलकर यांचा सोलापूरच्या श्री. मनीष रावत यांनी ३-० असा पराभव केला.

६. <u>जिल्हा स्तरीय कामगिरी -</u> १)TSTT-PTKS पहिली जिल्हा स्तरीय रॅनकिंग टेबल - टेनिस स्पर्धा २०२४-२५ दिनांक १९.०६.२०२४ या कालावधीत प्रबोधन क्रीडा संकुल, विर्लेपार्ले ,मुंबई येथे पार पडल्या.सदर स्पर्धेत श्रीमती. श्रावणी ढापरे यांनी भाग घेतला होता. श्री. श्रावणी ढापरे यानी कास्य पदक प्राप्त केले.

७. <u>MFC-TSTTA दुसरी जिल्हा स्तरीय रॅनकिंग टेबल -टेनिस स्पर्धा -२०२४</u> :- दिनांक ३१.०७.२०२४ ते ०४.०८.२०२४ या कालावधीत श्री.श्रावणी ढापरे यांना कास्य पदक प्राप्त झाले.

८.<u>TSTTA-खार जिमखाना तिसरी जिल्हा स्तरीय रॅनकिंग टेबल - टेनिस स्पर्धा २०२४</u> - खार येथे पार पडली. सदर स्पर्धेत श्रीमती. श्रावणी ढापरे यांना रौप्य पदक प्राप्त झाले.

## व्हॉलीबॉल



१. <u>आंतर आगार व्हॉलीबॉल स्पर्धा २०२४-२५:-</u>

दिनांक ०६जानेवारी २०२५ ते १० जानेवारी २०२५ दरम्यान वडाळा कर्मचारी वसाहत मैदान ,वडाळा येथे पार पडली. वडाळा बेस्ट कर्मचारी वसाहतीतील, क्रीडांगणावर स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेमध्ये २१ संघानी भाग घेतला होता

दिनांक ०६.०१.२०२५ रोजी माननीय श्री. विनायक माणिकराव शिंदे उप मुख्य सुरक्षा अधिकारी, (सुरक्षा व दक्षता विभाग) कुलाबा आगार यांच्या शुभहस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. या प्रसंगी श्री. धनंजय

पवार – माजी सभापती (क्रीडा), श्री. अशोक सांगळे- मनोरंजन पर्यवेक्षक, श्रीमती सायली परब, (मानद् सचिव - बॅडमिंटन), श्री. सूर्यकांत भोपी, (मानद् सचिव –फूटबॉल), श्री. किशोर औटी (मानद् सचिव -कबड्डी),उपस्थित होते. सूत्रसंचालन श्री भूपेश गावड यांनी केले.

दिनांक १०.०१.२०२५ रोजी पारितोषिक वितरण समारंभा पूर्वी स्पर्धेचा अंतिम सामना दादर कार्यशाळा विरुद्ध कुलाबा आगार या संघामध्ये खेळाला गेला या सामन्यात कुलाबा आगार संघाचा विजय झाला. दादर कार्यशाळा हा संघ उपविजेता ठरला या स्पर्धेमध्ये कर्मचा-यांची पाल्ये विनीत पवार, मयुर आरसे , सुनील खणकर, सिध्देश फारकते.यांना उत्कृष्ट खेळाडू म्हणून घोषित करण्यात आले.

या प्रसंगी प्रथेनुसार प्रेक्षणीय सामन्यासाठी मुंबई पोलीस या संघाला आमंत्रित केले होते. या संघामध्ये प्रेक्षणीय सामना खेळविण्यात आला.

दिनांक १०.०१.२०२५ रोजी स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ माननिय श्री.गोपाळ गणपत सांगवेकर ,वरिष्ठ व्यवस्थापक (आंतर लेखा परीक्षा) यांच्या अध्यक्षते खाली संपन्न झाला. या प्रसंगी श्री.सुहासजी सामंत,माजी बेस्ट समिती सदस्य ,श्री. राजाराम द,करे, उप मुख्य व्यवस्थापक (कार्ये-२), श्री. प्रमोद यादव सरचिटणीस - (क्रीडा ) श्री. धनंजय पवार – माजी सभापती (क्रीडा), श्री. विनायक द माणिकराव शिंदे उप मुख्य सुरक्षा अधिकारी,(सुरक्षा व दक्षता विभाग) कुलाबा आगार, श्री. बाळा निकम (प्रशिक्षक) मुंबई पोलिस संघ तसेच वडाळा कर्मचारी वसाहत संघटनेच अध्यक्ष उपस्थित होते. सूत्रसंचालन श्री.भूपेश गावड यांनी केले. श्री.शिवकुमार गोसाई – (मानद् सचिव – व्हॉलीबॉल) यांनी आभार प्रदर्शन केले.

सन २०२५-२६ व्हॉलीबॉल संघ खालीलप्रमाणे.

| क्र. | नाव (सर्वश्री) | क्र. | नाव (सर्वश्री) | क्र. | नाव (सर्वश्री) |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.नागेश शिवगण | २ | श्री भूपेश गावड | ३ | श्री संदिप बेलसरे |
| ४ | श्री. संदिप कोरडे | ५ | श्री.निलेश महागांवकर | ६ | श्री.सुधीर कारंडे |
| ७ | श्री.दिपक चव्हाण | ८ | श्री.संतोष नलावडे | ९ | श्री.दिगंबर दळवी |
| १० | श्री.सुहास धुरे | ११ | श्री.निलेश कांबळे | १२ | श्री.अमितेश भुवड |

राखीव खेळाडू

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री ऋषीकुमार दुबे | २. | श्री.श्रीकांत वेदांते |

सपोर्ट स्टाफ


| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.उमेश गोवारी | २. | श्री.अमोल देसाई |

मदतनीस - राजू चलगेरी

प्रशिक्षक - सुमुख केरकर

निवड समिती : सर्वश्री सुमुख केरकर, ऋषीकुमार दुबे,परेश पारकर

## कुस्ती



१. महाराष्ट्र राज्य कुस्ती स्पर्धा २०२४-२०२५:-

दाजी बाळकू पाटील, बस चालक०१३२०३ वरळी आगार,महाराष्ट्र राज्य कुस्ती स्पर्धा २०२४-२५ कालावधी २७ जानेवारी २०२५ ते ४ फेब्रुवारी २०२५ या अहिल्याबाई नगर २७ व २८या दोन दिवसांच्या कॅम्प मध्ये मेडिकल चाचणी पुर्ण झाल्या, २९ तारखेला सकाळी ६५ किलो

वजन मोजणी झाली व कुस्तीचे उद्घाटन व कुस्ती सामने चालू ३०तारखेला सकाळी पहिला कुस्ती विशाल राजगे (सातारा)विरूद्ध विजयी झालो. दिनांक ३१ तारखेला दुसरी कुस्ती लखण पाटील (रत्नागिरी) विरुद्ध विजयी झालो.तिसरी कुस्ती By (बिन विरुद्ध) मी विजयी झालो. दिनांक १ फेब्रुवारी २०२५ला चौथी कुस्ती अमित घाडगे (जालणा) विरुद्ध विजयी झालो. पाचवी कुस्ती अक्षय पावले (ठाणे) विरूद्ध विजयी झालो. पुढील कुस्ती दिनांक २ तारखे ऐवजी ३.०२.२०२५ तारखेला उपांत्य फेरीत साहवी कुस्ती केली होती. त्यात ज्योतीबा आटकले सोबत झाली. या कुस्ती सामन्यात पराभूत झालो.

*** मंडळातील सन २०२४-२५ मधील कलाकार / खेळाडूंची उल्लेखनीय कामगिरी ***

-: कला विभाग :-
नाटय विभाग

१. ६३वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाटय स्पर्धा – २०२४-२५ :-

६३व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाटय स्पर्धेत मुंबई २ केंद्रातून 'जगज्जेता' या नाटकाला सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे प्राथमिक फेरी आयोजित करण्यात आली होती. या नाटकाच्या प्रयोगाचे निकाल दिनांक १९ डिसेंबर २०२४ रोजी मुंबई- २ केंद्राने जाहीर केले आहे. या नाटकात रंगभूषाला प्रथम पारितोषिक जाहीर झाले आहे.

'जगज्जेता' या नाटकाचे प्राथमिक पारितोषिक खालीलप्रमाणे:-

| अ.क्र | नाव | तंत्रज्ञ प्रकार | पारितोषिक | नाटकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | वासुदेव आंब्रे | रंगभूषा | प्रथम | जगज्जेता |

२. ६३व्या महाराष्ट्र राज्य हिंदी नाटय स्पर्धा – २०२४-२५ :- स्पर्धेच्या अंतिम फेरीत दिनांक ०५.०३.२०२५ रोजी शोभायात्रा' हे नाटक यशवंत नाटय मांटुगा येथे संध्याकाळी ६.०० वाजता सादर करण्यात आला. दिनांक १२.०३.२०२५ रोजी सांस्कृतिक कार्य संचालनालयाने प्रसिध्दीपत्राकाद्वारे निकाल जाहीर केला आहे.आपल्या या नाटकाला पाचवे पारितोषिक जाहीर झाले आहे.

| अ.क्र | नाव | पारितोषिक | नाटकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | सविंद नांदलस्कर | उत्कृष्ट अभिनय - रौप्य पदक | शोभायात्रा |
| २ | चंद्रकांत सावंत | उत्कृष्ट अभिनय गुणवत्ता प्रमाणपत्र | |

## -: क्रीडा विभाग :-

### मैदानी खेळ

.ऑल इंडिया पब्लिक बस ट्रान्सपोर्ट ॲथलेटिक्स (ASRTU ) २०२४:

असोशिएशन ऑस्टेट - रोड ट्रान्सपोर्ट अंडरटेकींग, नवी दिल्ली यांच्या अधिपत्याखाली 'ऑल इंडिया पब्लिक बस ट्रान्सपोर्ट ॲथलेटिक्स मीट २०२४ चे दिनांक ०६.१२.२०२४ ते ०८.१२.२०२४ रोजी ठिकाण - पोलीस परेड मैदान, विशाखा पट्टणम येथे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत १९ एस.टि.यु. संघाचे २६६ पुरुष व १३६ महिला खेळाडूंनी सहभाग घेतला सदर स्पर्धेत बेस्टच्या ११ खेळाडूंनी सहभाग घेऊन महिला खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले. तर पुरूष खेळाडूंनी इतर संघाच्या २३ते ३०वयाच्या पुरूष स्पर्धकांशी झुंज देऊन दुस-या – तिस-या फेरीपर्यंत मजल मारली.

| अ.क्र | विजेत्याचे नाव | वयोगट | स्पर्धेचा प्रकार | पदक |
|---|---|---|---|---|
| १. | प्रतिक्षा शेलार | ४५+ | १००मी. धावणे,२००मी धावणे | २सुवर्ण पदक |
| २. | कल्पना भोसले | ५०+ | १०००मी.चालणे | सुवर्ण पदक |
| ३. | किर्ती पाडळकर | ५०+ | १०००मी.चालणे | रौप्य पदक |
| ४. | भाग्यश्री पै | ५५+ | ४००मी. चालणे. | रौप्य पदक |
| ५. | शिला शिरटावले | ४०+ | ४००मी. धावणे, | कास्य पदक |
| ६. | राजेश पवार | ४५+ | २००मी.धावणे , ४००मी.धावणे | चौथा, अंतिम फेरीत बाद |
| ७. | प्रकाश धस | ४०+ | ८००मी. धावणे,१५००मी.धावणे | सहावा ,पाचवा |
| ८. | नितीन कुराडे | ३५+ | भाला फेक, गोळा फेक | सहावा, दहावा |
| ९. | अमोल म्हात्रे | ४५+ | गोळा फेक, थाळी फेक | सहावा , सातवा |
| १०. | भुषण थोरात | ३५+ | १००मी.धावणे ,लांब उडी | पहिल्या फेरीत बाद, आठवा |
| ११. | अमरशील पवार | ५०+ | ४००मी.धावणे , लांब उडी | पहिल्या फेरीत बाद, अकरावा |

बेस्ट संघाच्या खेळाडूंची सविस्तर कामगिरी

आपल्या बेस्ट संघाची सर्वात वेगवान खेळाडू श्रीमती. प्रतिक्षा शेलार ही स्पर्धेतील ४०० खेळाडूंची चाहती झाली. तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत होता. तसेच संपूर्ण वैयक्तिक क्रीडा प्रकारात दोन सुवर्ण पदक पटकावणारी ती एकमेव विजेती ठरली. दिल्ली येथे कार्यरत असलेले बेस्ट चे अधिकारी श्री.पवन जामोदकर साहेबांनी तिचे विशेष कौतुक केले.

### टेबल-टेनिस विभाग



३ MCDTTA आंतर कार्यालयीन टेबल -टेनिस लिग स्पर्धा २०२४-२५:- NSCI वरळी येथे दिनांक २७.०५.२०२४ ते २९.०६.२०२४ घेण्यात आली सदर स्पर्धेत बेस्टच्या एकूण ३ संघाने भाग घेतला होता. पुरूष संघ ऐ,.बी, सी पुरुष संघ 'ए' व पुरूष संघ 'बी' या दोन्ही संघाला सुर्वण पदक प्राप्त झाले.

पुरुष 'ए' संघातील खेळाडू खालील प्रमाणे. :-

५) श्री. नितिन वालावलकर (कर्णधार)
६) श्री. नितेश नायक
७) श्री. निलेश जानवलेकर
८) श्री. स्टॅनी ॲन्थॉनी

पुरुष 'बी' संघातील खेळाडू खालील प्रमाणे.

५) श्री. नंदकुमार पारकर (कर्णधार)
६) श्री संदीप कंक
७) श्री. जितेंद्र पवार
८) श्री. सुमंत तोरसकर

सदर स्पर्धेत पुरुष संघ 'ए' यांनी Div. II मध्ये मुंबई पोर्ट ट्रस्ट 'ए' या संघाचा पराभव करुन सुवर्ण पदक प्राप्त केले. तर पुरुष संघ 'बी'यांनी Div III मध्ये आर. बी. आय 'सी'या संघाचा पराभव करून सुवर्ण पदक प्राप्त केले.

४. नॅशनल (National) -३० th नॅशनल मास्टर टेबल- टेनिस चॅपियन स्पर्धा २०२४-२५स्पर्धा -

सरूर नगर इंडोर स्टेडियम ,डॉक्टर कॉलनी, एल.बी. नगर रंगारेड्डी डिस्ट्रीक कोर्ट, हैदराबाद ५०००७४, तेलंगणा येथे दिनांक ०३.०४.२०२४ ते ०८.०४.२०२४ या कालावधीत पार पडल्या

सदर स्पर्धेत संपुर्ण भारतातून एकूण ३१ राज्यांचा ६६ महिलांचा सहभाग होता.सदर स्पर्धेत बेस्ट संघाच्या श्रीमती. श्रावणी ढापरे यांचा समावेश होता. एकूण ६६ महिलांचा समावेश असणा-या या स्पर्धेत श्रीमती. श्रावणी ढापरे या मास्टर नॅशनल २०२४-२५ सदर स्पर्धेतील श्रीमती श्रावणी यांची कामगिरी.

४) महिला - एकेरी – उपांत्य फेरीत प्रवेश

५) महिला – दुहेरी – उपांत्य फेरीत प्रवेश

६) मिश्र - दुहेरी - कास्य पदक


५ TSTTA- खार जिमखाना तिसरी जिल्हा स्तरीय रॅनकिंग टेबल - टेनिस स्पर्धा २०२४ - खार येथे पार पडली. सदर स्पर्धेत श्रीमती. श्रावणी ढापरे यांना रौप्य पदक प्राप्त झाले.

बेस्ट कला क्रिडा रौप्य पदक

सन २०२४-२०२५ दरम्यान प्रदान करण्यात आलेले'बेस्ट कला क्रीडा रौप्य पदक' 'व सन्मानचिन्ह तपशील पुढीलप्रमाणे-

| अ. क्र. | कार्यक्रमाचे नाव | दिनांक | ठिकाण | रौप्य पदक / सन्मानचिन्ह कलाकार, खेळाडू / पदाधिकारी |
|---|---|---|---|---|
| १. | महेश कांबळी | ०३.०१.२०२५ | यशवंत नाटय मंदिर, माटुंगा | रौप्य पदक |
| २. | नरेश चाळके | ०३.०१.२०२५ | यशवंत नाटय मंदिर, माटुंगा | रौप्य पदक |
| ३. | प्रकाश नायर | ०३.०१.२०२५ | यशवंत नाटय मंदिर, माटुंगा | रौप्य पदक |
| ४. | शिवकुमार गोसाई | ०३.०१.२०२५ | यशवंत नाटय मंदिर, माटुंगा | रौप्य पदक |
| ५. | दादा गोरड | २९.०३.२०२५ | विष्णुदास भावे नाटयगृह, वाशी | सन्मानचिन्ह |
| ६. | गणेश बाबळे | २९.०३.२०२५ | विष्णुदास भावे नाटयगृह, वाशी | सन्मानचिन्ह |
| ७. | प्रभाकर कांबळे | २९.०३.२०२५ | विष्णुदास भावे नाटयगृह, वाशी | सन्मानचिन्ह |

:: भावपूर्ण श्रध्दांजली ::



## मारुती दळवी

मृत्यू : ६.०२.२०२५

**लेखक दिग्दर्शक अभिनेता म्हणून मंडळाकरीता योगदान दिले आहे.**

---

:: भावपूर्ण श्रध्दांजली ::



## अरुण कंथारिया

मृत्यू : २१.०४.२०२५

हरहुन्नरी कलाकार, उत्कृष्ट निवेदक, आणि रांगोळीकार योगदान दिले आहे.

# :: भावपूर्ण श्रध्दांजली ::



## सुरेश गोलतकर

मृत्यू : २०.०४.२०२५

हरहुन्नरी कलाकार, उत्कृष्ट चित्रकार आणि
रांगोळीकार व सजावट म्हणून त्यांनी
योगदान दिले आहे.

## बेस्ट कला आणि क्रीडा मंडळ

दिनांक ३१ मार्च, २०२५ रोजी संपलेल्या वर्षाचे उत्पन्न - खर्च लेखा विवरणपत्र

| २०२३-२०२४ रु पै. | खर्चाचा तपशील | २०२४-२०२५ रु पै. | २०२३-२०२४ रु पै. | उत्पानाचा तपशील | २०२४-२०२५ रु पै. |
|---|---|---|---|---|---|
| ८३७८२.०० | ए.एस.आर.टी.यू स्पर्धा (ASRTU Tourtt) | ४८२६८.०० | | | |
| १८००००.०० | मैदानी खेळ | १७००००.०० | १००००००.०० | बेस्ट उपक्रमाकडून अनुदान | १००००००.०० |
| २३००००.०० | बॅडमिंटन | २१४८१२.०० | १८६८८८०.०० | सभासद वर्गणी | १७४१२८०.०० |
| २०००००.०० | क्रिकेट | १९९७४४.०० | १८००.०० | सभासद प्रवेश शुल्क | ८६८०.०० |
| १९००००.०० | फुटबॉल | १८९०४०.०० | ०.०० | बचत खात्यावरील व्याज | ०.०० |
| १६५०००.०० | हॉकी | १६००००.०० | ४९०९१०.०० | मुदत ठेवीवरील व्याज | ५३२८१५.०० |
| २०००००.०० | बैठे खेळ | १८९८४९.०० | | -:जमा:- | |
| १४५०००.०० | कबड्डी | १३९९६८.०० | ९९८०.०० | मैदानी खेळ | १३३८०.०० |
| १५००००.०० | टेबल टेनिस | १४३१२५.०० | ३३६०.०० | बॅडमिंटन | ७६४०.०० |
| १४००००.०० | व्हॉलीबॉल | १३४६४७.०० | २५८००.०० | क्रिकेट | ३२७५०.०० |
| १२३४६७.०० | सर्वसाधारण-क्रीडा | १९९३५८.५० | ८००.०० | फुटबॉल | ८००.०० |
| १८३३६३.०० | सर्वसाधारण-कला | १९९९९९.५० | ६००.०० | हॉकी | ६००.०० |
| १५३२६३.०० | एकांकिका | १६८५६८.०० | ६३००.०० | बैठे खेळ | ६५००.०० |
| २८२३७३.०० | संगीत | ७२५४३.०० | ३२००.०० | कबड्डी | ४०००.०० |
| ४३३४३१.०० | विविध करमणूक | ४५११७०.०० | ५१२०.०० | टेबल टेनिस | ५१२०.०० |
| ५८००००.०० | नाटय विभाग | ५८००००.०० | १९००.०० | व्हॉलीबॉल | ४२००.०० |
| १६००००.०० | ललित कला व प्रदर्शन | १४९४६५.०० | ०.०० | एकांकिका | ४२५०.०० |
| १०९८१३.०० | घसारा | १२७६९२.०० | ०.०० | संगीत | ०.०० |
| १०९८१३.०० | घसारा | १२७६९२.०० | ०.०० | सर्व साधारण कला | २७९००.०० |
| ०.०० | दुरुस्ती आणि देखभाल | २८००००.०० | १२०१००.०० | विविध करमणूक | १३६३४०.०० |
| | | | ६७५२५.०० | नाटय विभाग | १३६७००.०० |
| | | | १०३२१७.०० | उत्पन्ना पेक्षा जास्त खर्च | १५४९९४.०० |
| ३७०९४९२.०० | एकूण | ३८१७९४९.०० | ३७०९४९२.०० | एकूण | ३८१७९४९.०० |

दिपक तांबवे 30/6/25
मा. लेखा परिक्षक

प्रमोद यादव 27/6/25
सरचिटणीस-क्रीडा

विजय सूर्यवंशी २७/६/२५
सरचिटणीस-कला

विजय अंदे 27/06/25
मा. खजिनदार

# बेस्ट कला आणि क्रीडा मंडळ

बेस्ट कला आणि क्रीडा मंडळ

दिनांक ३१ मार्च, २०२५ रोजी संपलेल्या वर्षाचे ताळेबंद पत्रक

| २०२३-२०२४ रु पै | दायित्वे | २०२४-२०२५ रु पै | २०२४-२०२५ रु पै | २०२३-२०२४ रु पै | मालमत्ता | २०२४-२०२५ रु पै | २०२४-२०२५ रु पै |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १५०९८८३४.०० | सर्वसाधारण निधी मागील ताळेबंदनुसार शिल्लक | १५०९८८३४.०० | | १०८६९०३.०० | कायम स्वरुपाची मालमत्ता | १३१५८२३.०० | ११८८१३१.०० |
| | वजा : मानद् सचिव संगीत येणे वसूली | ३०००.०० | | | वजा - घसारा तरतूद १०% प्रमाणे | १२७६९२.०० | |
| | वजा : उत्पन्ना पेक्षा जास्त खर्च | १५४९९४.०० | १४९४०८४०.०० | -- | -: ठेवी :- | | – |
| | | | | ८००००००.०० | बँक ऑफ इंडियातील मुदत ठेव | | ८००००००.०० |
| | | | | -- | अनामत ठेवी :- | | – |
| | | | | १५०००.०० | यशवंत नाटय मंदिर | | १५०००.०० |
| ०.०० | कलादालन दुरुस्ती व देखभाल | | २,८०,०००.०० | | | | |
| | | | | ७७८५.०० | सचिवांकडे असलेली आगाऊ रक्कम | | ०.०० |
| ४६१६१४.०० | क्रीडा साहित्याकरिता तरतूद | | ३,८१,४१४.०० | -- | बँक ऑफ इंडिया खाते | | |
| | | | | ४१६४५३६.१८ | चालू खाते | | २८४३४१७.१८ |
| | | | | ७०३६३.०० | बचत खाते | | ७०३६३.०० |
| | | | | ०.०० | बेस्ट उपक्रम अनुदान येणे बाकी | | १००००००.०० |
| | | | | १५४५३६०.०० | सभासद वर्गणी येणे बाकी | | १७५७५००.०० |
| | | | | १३४०.०० | प्रवेश शुल्क येणे बाकी | | ५४००.०० |
| | | | | १७८४३७.०० | स्त्रोतातून कर वजात २०१९-२०२० | | १७८४३७.०० |
| | | | | १६२०८६.०० | आयकर भरणा २०२०-२०२१ | | १६२०८६.०० |
| | | | | १३४२०४.०० | आयकर भरणा २०२१-२०२२ | | १३४२०४.०० |
| | | | | १४५३४२.८२ | आयकर भरणा २०२२-२०२३ | | १४५३४२.८२ |
| | | | | ४९०९१.०० | आयकर भरणा २०२३-२०२४ | | ४९०९१.०० |
| | | | | ०.०० | आयकर भरणा २०२४-२०२५ | | ५३२८२.०० |
| १५५६०४४८.०० | एकूण | | १५६०२२५४.०० | १५५६०४४८.०० | एकूण | | १५६०२२५४.०० |

30/6/25 दिपक तांबवे मा. लेखा परिक्षक

27/6/25 प्रमोद यादव सरचिटणीस - क्रीडा

२७/६/२५ विजय सूर्यवंशी सरचिटणीस - कला

विजय अंदे मा. खजिनदार

# बेस्ट कला आणि क्रीडा मंडळ

दुरध्वनी क्र. ७२०८८३६०९०

बहुमजली इमारत,
७ वा मजला, बेस्ट मार्ग,
कुलाबा, मुंबई - ४००००१.

संदर्भ: कला व क्रीडा / लेखा परीक्षण प्रमाणपत्र / ०११ / २०२५ — दिनांक : ३०.०६.२०२५

**श्री. गिरीष चंदनकर**
सभापती (कला)
बेस्ट कला आणि क्रीडा मंडळ
मुख्य अभियंता - ग्राहकसेवा

**श्री. मनोज गडहिरे**
सभापती (क्रीडा)
बेस्ट कला आणि क्रीडा मंडळ
उप - मुख्य लेखा अधिकारी (नियामक आयोग)

**विषय : आर्थिक वर्ष २०२४–२०२५, ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या, बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाच्या हिशोबांचे लेखापरिक्षण प्रमाणपत्र**

**महोदय,**

सन २०२४ – २०२५ आर्थिक वर्षाचे दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाचे हिशोब तपासण्यात आले आहेत. सदर लेखा विवरणपत्र व ताळेबंद योग्य आहे

मंडळाच्या खर्चाचे हिशोब योग्यरीतीने ठेवण्याकरिता सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये करण्यात आलेल्या निरनिराळया सूचना, कला आणि क्रीडा मंडळाच्या व्यवस्थापन समितीने स्विकारल्या आहेत.

धन्यवाद !

आपला विश्वासू

दिपक तांबवे
मानद् लेखा परिक्षक
उप व्यवस्थापक लेखापरिक्षा(I)